cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–८९ | शनिवार दि.२० जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मस्तवाल नोकरासुर!


माजी सनदी अधिकारी अरुण भाटिया यांना पत्रकाराने पूजा खेडकर प्रकरणावर प्रतिक्रिया विचारल्यावर त्यांनी 'हे प्रकरण उघडकीस आले याचा मला आनंदच आहे. हे प्रकरण उघडकीस आल्याने सामान्यांना किमान नोकरशाहीत काय चालते, हे तरी दिसले. हे प्रकरण निव्वळ हिमनगाचे टोक आहे. नोकरशाही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे देशातील गैरव्यवहार व भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्याचेच काम करते. म्हणजे ते काम करतात तेव्हाही गैरव्यवहार व भ्रष्टाचाराला चालना देतात आणि जेव्हा काम करत नाहीत तेव्हा गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचे मूक दर्शक बनून या प्रकाराला चालनाच देत असतात.

## सोनं ५०० रुपयांनी स्वस्त

मुंबई : सोन्याच्या दरात गेल्या काही दिवसांपासून चढ-उतार होत आहे. या आठवड्यात कमोडिटी बाजारात सोन्याच्या दरात तेजी दिसून आली होती. मात्र, शुक्रवारी सोन्याच्या दरात मोठी घट झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या दरात घट झाल्यानंतर आता त्याचा परिणाम वायदे बाजारातदेखील दिसू लागला आहे. वायदे बाजारातही सोन्या–चांदीच्या दरात घट झाली आहे. ग्लोबल मार्केटमध्ये सोनं ४० डॉलरने कोसळून २,४५० डॉलरवर स्थिर झाले होते. तर, चांदीदेखील १ टक्क्याने घसरून ३० डॉलरच्या जवळपास पोहोचली होती. सोन्याचे दर ५०० रुपयाने स्वस्त झाले आहेत.

## पूजा खेडकरांवर दिल्लीत फसवणुकीचा गुन्हा दाखल

**युपीएससीच्या तक्रारीनंतर क्राईम ब्रँचची कारवाई; प्रशिक्षण रद्द, उमेदवारी रद्द करण्यासाठी नोटिस**



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या अडचणीत आणखी वाढ होताना दिसत आहे. यूपीएससीने केलेल्या तक्रारीनंतर दिल्ली क्राईम ब्रँचने पूजा खेडकर यांच्यावर बनावटगिरी, फसवणूक आणि दिव्यांगत्वाच्या कायद्याखाली गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे पूजा खेडकरांच्या प्रकरणात आता दिल्ली क्राईम ब्रँचही तपास करणार असल्याने खेडकरांचा पाय आणखी खोलात चालल्याची स्थिती आहे. तसेच त्यांचे प्रशिक्षण रद्द करण्यात आले उमेदवारी रद्द का करु नये यासाठी नोटिस बजावली आहे.

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकरांवर खोटे दिव्यांग प्रमाणपत्र बनवून परीक्षा दिल्याचा आरोप करण्यात येत आहे तसेच कोट्यवधींची संपत्ती नावावर ◀◀ पान २ वर

# इथेनॉल निर्मितीसाठी महाराष्ट्रासह १५ राज्याचा पुढाकार

**उत्पादन वाढवण्यासाठी केंद्र सरकारचा निर्णय; सुधारित बियाणे देणार**



**मुंबई । प्रतिनिधी**

**देशातील १५ राज्यांतील ७८ जिल्ह्यांमध्ये मका उत्पादन वाढवण्याची मोहीम सुरु झाली. शेतकऱ्यांना सुधारित वाणांचे बियाणे वाटप करण्यात येत असून सुधारित मका उत्पादनाचे प्रशिक्षण दिले जात आहे. इथेनॉलच्या उत्पादनासाठी मोठी मागणी आहे. त्यामुळे भारतीय कृषी संशोधन परिषद उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे. महाराष्ट्रासह १५ राज्यात हा उपक्रम राबवण्यात येणार असून इथेनॉल निर्मितीसाठी केंद्र सरकार पुढाकार घेणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.**

आता बदलत्या महत्त्व आणखी वाढले आहे. कारण ते केवळ मानवी नाही तर ते आता पोल्ट्री देखील आहे. आता ते एक ऊर्जा पीक म्हणून देखील खूप वेगाने उदयास ◀◀ पान २ वर

### मका उत्पादनात १० दशलक्ष टन वाढ करण्याचे लक्ष

कृषी मंत्रालयाने पुढील पाच वर्षांत मका उत्पादनात १० दशलक्ष टन वाढ करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. याचे कारण म्हणजे पोल्ट्री फीडसाठी मक्याची मागणी वाढत असून इथेनॉल उत्पादनासाठी उत्पादन वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. कृषी मंत्रालयाच्या मते, २०२२–२३ मध्ये खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामात ३८०.८५ लाख मेट्रिक टन म्हणजेच सुमारे ३८ दशलक्ष टन मक्याचे उत्पादन झाले आहे. यात वाढ करणे ही काळाची गरज आहे.

### या १५ राज्यात वाढणार मकेचे उत्पादन?

या प्रकल्पाचे नेतृत्व करणाऱ्या आयआयएमआरचे वरिष्ठ मका शास्त्रज्ञ डॉ. एस.एल. जाट यांनी या प्रकल्पाबाबत माहिती दिली आहे. या प्रकल्पांतर्गत भारतातील १५ राज्यांमध्ये १५ क्लस्टर तयार करण्यात आली आहेत. याअंतर्गत ७८ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. तिथे मक्याचे उत्पादन वाढवण्याची मोहीम राबविली जाणार आहे. या १५ राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, आसाम, पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, ओडिशा, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, उत्तराखंड, कर्नाटक आणि हरियाणा यांचा समावेश आहे. याअंतर्गत १५०० एकरात मका पेरायची आहे. त्यापैकी खरीप २०२४ हंगामासाठी ११४० एकर क्षेत्राचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी सर्व संबंधित जिल्ह्यांमध्ये सुधारित बियाणांचे वाटप करण्यात येत आहे.

# रेल्वेच्या कामाला गती येणार; मुंडे बहिण–भावाच्या एकीची ताकद दिसणार

**रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची घेतली भेट; सर्वच मुद्दयांवर सकारात्मक चर्चा**



**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील रेल्वे प्रश्नांवर मुंडे बहिण–भावाने एकीची ताकद दाखवत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन विविध मागण्यां लावून धरल्या. त्यामुळे नगर–बीड–परळी रेल्वे मार्गाच्या कामाला गती मिळणार असून परळी वैद्यनाथ ते परभणी रेल्वे रूळ दुहेरीकरण करताना कोणावरही अन्याय होणार नाही, असा शब्द रेल्वेमंत्र्यांनी यावेळी शिष्टमंडळाला दिला. मुंडे बहिण–भावाने एकत्र येत बीड जिल्ह्यातील रेल्वेच्या कामासंदर्भात आपली ताकद दाखवल्याने सर्वच मागण्यां पुर्ण होण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली आहे.**

परळी वैद्यनाथ ते परभणी रेल्वे रूळ दुहेरीकरण करण्यासाठी कुणाचाही विरोध नाही, मात्र यासाठी भूसंपादन करताना कुणाचेही राहते घर बाधित होऊ नये. त्यासाठी भूसंपादन करताना दक्षिण ऐवजी मूळ रुळाच्या उत्तर बाजूने भूसंपादन केले जावे तसेच भूसंपदान करण्यासाठी १९ जून रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले राजपत्र स्थगित करावे, अशी मागणी आज केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना समस्त परळीकरांच्या वतीने कृषिमंत्री धनंजय मुंडे व आ.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने निवेदनाद्वारे केली आहे.

परळी–परभणी रेल्वे रूळ दुहेरीकरण संदर्भात सुमारे ३५० आक्षेप अर्ज दाखल झाले असून त्याबाबत निर्णय, परळी–बीड–नगर रेल्वे कामाला गती देणे यांसह बीड जिल्ह्यातील रेल्वे विषयक विविध मागण्यांच्या संदर्भात कृषिमंत्री धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे व शिष्टमंडळाने गुरुवारी सायंकाळी मुंबई येथे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन निवेदन सादर करत सविस्तर व सकारात्मक चर्चा केली. मंत्री श्री.अश्विनी वैष्णव यांनीही सर्व मागण्या समजून घेत त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

परळी–बीड–अहिल्यानगर (अहमदनगर) रेल्वे कामाला परळीच्या ◀◀ पान २ वर

### मुंडे बहिण –भावासह शिष्टमंडळाच्या मागण्या

परळी–बीड–अहिल्यानगर (अहमदनगर) रेल्वे कामाला परळीच्या बाजूने देखील सुरुवात करण्यात यावी, परळी ते मुंबई स्वतंत्र एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी, लातूर एक्सप्रेस परळी पर्यंत वाढवण्यात यावी, नांदेड–पनवेल एक्सप्रेस प्रवाशांच्या व भाविकांच्या सोयीसाठी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पर्यंत वाढवण्यात यावी. घाटनांदूर मार्गाने जाणाऱ्या एक्सप्रेस गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा, घाटनांदूर परिसरातील राजा पांडे यांच्या शेतातून जाणाऱ्या रेल्वे रुळासाठी अंडरपास द्यावा, चोपणवाडी उड्डाणपूल, परळी शहर बायपास, उड्डाणपूल, पादचारी मार्ग आदी ठिकाणी अंडरपास उभे करण्यात यावेत, यांसह बीड जिल्ह्यातील महत्वाच्या रेल्वे विषयक मागण्यांबाबत निवेदनासह सविस्तर चर्चा करण्यात आली.

### रेल्वेमंत्र्यांनी दिला पुरेसा वेळ

रेल्वेमंत्री मुंबईत येणार हे समजताच परळीकरांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या या प्रश्नाच्या संदर्भात धनंजय मुंडे यांनी मुंबई येथे त्यांची वेळ घेतली. रेल्वेमंत्री हे पक्षाच्या एका बैठकीला आलेले असल्याने प्रचंड व्यस्त असतानाही धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांच्या आग्रहाखातर त्यांनी बैठकीतून व्यस्त वेळ काढून पक्षाच्या कार्यालयातच शिष्टमंडळासोबत चर्चा केली. यावेळी प्रस्तावित रेल्वे मार्ग, त्याचा नकाशा याची स्वतः प्रत्यक्ष पाहणी केली. धनंजय मुंडेंनी सादरीकरण करून परिस्थितीची जाणीव करून दिली.

### लवकरच रेल्वेची स्वतंत्र बैठक घेण्याचा दिला शब्द

विकासाचे कार्य अविरत सुरू ठेवत जनतेच्या हितार्थ निर्णय घेणारे आपले सरकार असून, परळी वैद्यनाथ सह बीड जिल्ह्यातील रेल्वे विषयक मागण्यांच्या संदर्भात स्वतंत्र बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतले जातील, असा शब्द यावेळी केंद्रीय रेल्वे मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी शिष्टमंडळाला दिला.



## शरद पवारांचे तीन उमेदवार जाहीर

अहमदनगर : रोहित पाटील यांच्यापाठोपाठ शरद पवारांकडून विधानसभेसाठी आणखी एका तरूण उमेदवाराचे नाव जाहीर करण्यात आले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीसाठी अहमदनगर जिल्ह्यातील अकोले मतदारसंघातून अमित भांगरे यांच्या पाठीशी उभे राहा असे सांगून या ठिकाणचे अजित पवार गटाचे आमदार किरण लहामटे यांना खाली बसवा असे आवाहनही शरद पवारांनी केले आहे. अकोलेतील शेतकरी मेळाव्यामध्ये ते बोलत होते. यापुर्वी त्यांनी दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचे सुपूत्र रोहित पाटील यांची तर जयंत पाटील यांनी करमाळा मतदार संघात नारायण पाटील यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे शरद पवारांचे तीन उमेदवार सध्या ठरले आहेत.

## वसंत मोरे यांना जीवे मारण्याची धमकी



पुणे–शिवसेना ठाकरे गटाचे पुण्याचे नेते वसंत मोरे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. मनसेच्या कार्यकर्त्याने आपल्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप वसंत मोरे यांच्याकडून करण्यात आला आहे. मनसेच्या एका ◀◀ पान २ वर

## विरोधकांना चोख उत्तर देणार भाजपची फायरब्रँड टीम

**दररोज दिले जाणार प्रत्युत्तर; सकाळी मुंडे–दानवेंसह चौघे,संध्याकाळी महाजन–मुनगंटीवारांसह ६ जण**



**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांच्या प्रचाराचा फटका बसलेल्या भाजपने आता विधानसभेच्या तोंडावर सावध पावले उचलत विरोधकांना जशास तसे प्रत्युत्तर देण्याचे ठरवले आहे. भाजपकडून आता रोज सकाळ–संध्याकाळ विरोधकांच्या टीकेवर प्रत्युत्तर देण्यात येणार आहे. त्यासाठी दहा जणांची फायरबँड टीम तैनात करण्यात आली आहे. यात सकाळी आ. पंकजा मुंडे, रावसाहेब दानवे यांच्यासह चार जण तर दुपारी ४ वा. सुधिर मुनगंटीवार, गिरीष महाजन यांच्यासह ६ जणांची ही टीम असणार आहे.**

भाजपकडून रोज सकाळी ९ वाजता प्रतिक्रिया देण्यासाठी चार जणांची टीम जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये नवनिर्वाचित आमदार पंकजा मुंडे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा समावेश आहे.

तर संध्याकाळी ४ वाजता प्रतिक्रिया देण्यासाठी भाजपकडून ६ जणांची टीम तैनात करण्यात आली असून त्यामध्ये ◀◀ पान २ वर

## आगामी विधानसभा निवडणुका शिवसेना ताकदीने लढवणार–परशुराम जाधव



**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त संपर्कप्रमुख माननीय परशुराम जाधव साहेब यांचा संपर्कप्रमुख पदी नियुक्ती झाल्यानंतर पहिलाच दौरा होता या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील संपूर्ण जिल्ह्यातील शिवसेनेच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी दिनांक १९ जुलै २०२४ रोजी जिल्हास्तरीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते सदरील बैठकीमध्ये बीड जिल्ह्यातील एकूण सहा विधानसभा मतदार संघाचा आढावा घेण्यात आला व त्या अनुषंगाने बोलताना संपर्कप्रमुख श्री परशुराम जाधव यांनी असे म्हटले की बीड जिल्हा हा पहिल्यापासूनच ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१६ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : १०.५० क्विंटल | २,२५१ | २,४९० | २,३७० |
| ज्वारी/हायब्रिड : ८०.०० क्विंटल | १,८५१ | २,८०० | २,३५३ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १४.०० क्विंटल | ९,७०१ | १०,५०१ | १०,१०१ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: १०.०० क्विंटल | २,५०० | ३,००१ | २,७१५ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: २५.०० क्विंटल | ४,४७५ | ४,४७५ | ४,४७५ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०१ | ५,८५० |

# जगातील सर्वात उंच ब्रीजवर भारतीय रेल्वे दिमाखात धावणार

**१५ ऑगस्ट दिवशी २० वर्षांनी स्वप्न साकार; हा पूल पॅरिसच्या आयफेल टॉवरपेक्षा २९ मीटर उंच**



**जम्मू । वृतसंस्था**

**येत्या स्वातंत्र्यदिनी म्हणजेच १५ ऑगस्ट रोजी जम्मू–काश्मीरच्या रियासी जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या जगातील सर्वात उंच स्टीलच्या कमान पूल चिनाब रेल्वे ब्रिजवर भारतीय रेल्वे दिमाखात धावणार आहे. त्यामुळे गेल्या २० वर्षांपासूनची प्रतीक्षा संपणार आहे. सांगलदन ते रियासी दरम्यान धावणारी ही रेल्वे सेवा उधमपूर–श्रीनगर–बारामुल्ला रेल लिंक प्रकल्पाचा भाग आहे. हा पुल पॅरिसच्या आयफेल टॉवरपेक्षा २९ मीटर उंच आहे. त्यामुळे याकडे संपुर्ण जगाचे लक्ष लागले आहे.**

२० जून रोजी या पुलावर ट्रेनची ट्रायल रन झाली होती. यापूर्वी १६ जून रोजी या पुलावर इलेक्ट्रिक इंजिनची चाचणी घेण्यात आली होती. हा पूल पॅरिसच्या आयफेल टॉवरपेक्षा २९ मीटर उंच आहे. आयफेल टॉवरची उंची ३३० मीटर आहे, तर १.३ किमी लांबीचा हा पूल चिनाब नदीवर ३५९ मीटर उंचीवर बांधण्यात आला आहे. हा पूल ◀◀ पान २ वर

### २० वर्षात पूल बांधून पूर्ण झाला

स्वातंत्र्याला ७६ वर्षे पूर्ण होऊनही काश्मीर खोरे बर्फवृष्टीच्या काळात देशाच्या इतर भागांपासून तुटलेले राहिले. २२ फेब्रुवारी २०२४ पर्यंत काश्मीर खोऱ्यात फक्त राष्ट्रीय महामार्ग–४४ वरूनच पोहोचता येत होते. काश्मीर खोऱ्याकडे जाणारा हा रस्ताही बर्फवृष्टीमुळे बंद असायचा. याशिवाय काश्मीरला जाण्यासाठी गाड्या जम्मू–तवीपर्यंत जात होत्या, तेथून लोकांना रस्त्याने सुमारे ३५० किलोमीटरचा प्रवास करावा लागत होता. जवाहर बोगद्यातून जाणाऱ्या या मार्गाने जम्मू–तावीहून घाटीत जाण्यासाठी लोकांना ८ ते १० तास लागायचे.

### पुलाचे आयुष्यमान १२० वर्षे

२००३ मध्ये, भारत सरकारने सर्व हवामान आधारावर काश्मीर खोऱ्याला देशाच्या इतर भागांशी जोडण्यासाठी चिनाब पूल बांधण्याचा निर्णय घेतला. जवळपास २ दशकांनंतर चिनाब नदीवर बांधलेला हा पूल तयार झाला आहे. हा पूल पुढील १२० वर्षांसाठी बांधण्यात आला आहे.

### चिनाब ब्रिजची भूकंप, पूर, हिमवर्षाव सहन करण्याची क्षमता

काश्मीर खोऱ्यात सर्व हवामान प्रवेश देण्यासाठी भारत सरकारने ३५,००० कोटी रुपये खर्चून उधमपूर–श्रीनगर–बारामुल्ला रेल्वे लिंक प्रकल्प सुरू केला आहे. या योजनेअंतर्गत हा पूल बांधण्यात आला आहे. जगातील सर्वात उंच पूल भूकंप, पूर, बर्फवृष्टी आणि स्फोटकांपासून संरक्षण करण्यासाठी खास तयार करण्यात आला आहे. तो भूकंपांपासून पूर्णपणे सुरक्षित आहे आणि रिश्टर स्केलवर ८ तीव्रतेच्या भूकंपाचाही सहज सामना करू शकतो.

cmyk

## अग्रलेख

# मस्तवाल नोकरासुर!

माजी सनदी अधिकारी अरुण भाटिया यांना पत्रकाराने पूजा खेडकर प्रकरणावर प्रतिक्रिया विचारल्यावर त्यांनी 'हे प्रकरण उघडकीस आले याचा मला आनंदच आहे. हे प्रकरण उघडकीस आल्याने सामान्यांना किमान नोकरशाहीत काय चालते, हे तरी दिसले. हे प्रकरण निव्वळ हिमनगाचे टोक आहे. नोकरशाही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे देशातील गैरव्यवहार व भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्याचेच काम करते. म्हणजे ते काम करतात तेव्हाही गैरव्यवहार व भ्रष्टाचाराला चालना देतात आणि जेव्हा काम करत नाहीत तेव्हा गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचे मूक दर्शक बनून या प्रकाराला चालनाच देत असतात. मागच्या काही दशकांमध्ये तर नोकरशाहीने सरकारसमोर लोटांगण घालण्याचेच धोरण अवलंबिले आहे.

त्यामुळे या नोकरशाहीकडून जनतेच्या सेवेची व भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याची अपेक्षा तरी कशी बाळगायची? हे सनदी अधिकारी त्यांना मिळणा-या अमर्याद व निरंकुश अधिकारामुळे सध्याच्या काळातले आधुनिक संस्थानिक बनले आहेत. ते जनतेचे सेवक नव्हे तर स्वत:ला जनतेचे मालक मानतात आणि त्यातूनच त्यांची अशी मस्तवाल वृत्ती बनली आहे', अशी प्रतिक्रिया दिली होती. प्रथमदर्शनी ही प्रतिक्रिया अत्यंत कडवट वा टोकाचीच वाटते. मात्र, पूजा खेडकर या प्रशिक्षणार्थी सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती मिळालेल्या अधिकारी कन्येचे एक-एक प्रताप जसजसे उघडकीस येतायत ते पाहून भाटियांची प्रतिक्रिया अत्यंत वास्तववादीच वाटते. कारण पूजा खेडकर प्रकरण उघडकीस आल्यानंतर तिने व्यवस्थेसोबत केलेला मस्तवाल खेळ तर स्पष्ट दिसतो आहे पण तिच्याबरोबरच तिच्या मातोश्रींचे प्रतापही उघडकीस येत आहेत.

मातोश्रींनी शेतक-यांना रिव्हॉल्व्हर दाखवून धमकावणे, अतिक्रमण करून घराचे बांधकाम करणे वगैरे प्रकार जेव्हा बाहेर येतायत तेव्हा हा मस्तवालपणा पूजा खेडकर यांनी वारसा हक्काने प्राप्त केला असल्याचीच खात्री पटते. आता या प्रकरणाशी संलग्न प्रकरणात पूजा खेडकर यांच्या लॉजमध्ये दडून बसलेल्या मातोश्रींना पोलिसांनी उचलले आहे तर पूजा खेडकर यांचे पिताश्री दिलीप खेडकर, जे स्वत: क्लास वन अधिकारी राहिले आहेत, यांचीही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी होण्याची शक्यता आहे. पूजा खेडकर मात्र आपले एवढे सगळे प्रताप उघडकीस आल्यावरही स्वत:चे काही चुकले हे अजूनही मानायला तयार नाहीत. उलट जोवर माझा दोष सिद्ध होत नाही तोवर मी निर्दोष आहे,

त्यामुळे माझे 'मीडिया ट्रायल' बंद करा, असा इशारा देऊन त्या मीडियालाच या प्रकरणी दोषी ठरवू पाहत आहेत. थोडक्यात कितीही भानगडी उघडकीस आल्या तरी त्यातून सहिसलामत सुटका करून घेऊन आपण निर्दोष सुटू हाच आत्मविश्वास त्यांच्या या वक्तव्यातून स्पष्टपणे झिरपतो आहे. म्हणजेच देशातील व्यवस्थेला आपण हवे तसे वाकवू शकतो, हाच त्यांचा विश्वास दिसतो. साहजिकच मग हा विश्वास किंवा मस्तवालपणा येतो कुठून? असा प्रश्न सामान्यांच्या मनात निर्माण होतो आणि अरुण भाटिया आपल्या प्रतिक्रियेतून त्याचेच उत्तर देतात. वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी असेल तरच 'नॉन क्रिमीलेअर' लागू होतो. खेडकर कुटुंबाची संपत्ती ४० कोटींपेक्षा अधिक असल्याची माहिती बाहेर येते आहे. मग पूजा खेडकरला नॉन क्रिमीलेअरचे सर्टिफिकेट मिळाले कसे? पूजा खेडकर यांनी नियुक्तीवेळी दिव्यांगत्वाची प्रमाणपत्रे दिली. या प्रमाणपत्रांच्या सत्यतेची पडताळणी करण्यासाठी वारंवार बोलावूनही त्या उपस्थित राहिल्या नाहीत. तरी त्यांना नियुक्ती मिळाली आणि त्यातही पहिली नियुक्ती त्यांना हव्या त्या गावात म्हणजे पुण्यात मिळाली. कशी? प्रशिक्षण कालावधीत पूजा खेडकर आपल्या खासगी आलिशान गाडीवर अंबर दिवा लावून हिंडत होत्या तरी त्यांच्यावर कारवाई झाली नाही. का? एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या खासगी मोटारीवर 'भारत सरकार' अशी पाटीही झळकावली. ती कुणी उतरवू शकले नाही. का? रुजू होण्यापूर्वी त्यांनी भांडून नवेकोरे छान दालन मिळविले. कसे? अशा एक ना अनेक प्रश्नांचे उत्तर एकच ते म्हणजे भाटिया सांगतात ती आधुनिक संस्थानिक वृत्ती! या वृत्तीने व्यवस्थेला आपल्याला पाहिजे तसे वाकवता येते कारण आपणच या व्यवस्थेचे मालक आहोत हे ठरवून टाकले आहे. त्यातूनच या व्यवस्थेतून मस्तवाल नोकरासुर तयार झाले आहेत आणि त्यांच्यावर कुणाचे नियंत्रण नसल्याने पूजा खेडकरसारखे नवे मस्तवाल नरकासुर जन्माला येत आहेत. प्रशासकीय सेवेत येणारा अधिकारी समर्पित भावनेचा, नि:स्पृह व लोककल्याणासाठी तत्परतेने कार्यरत असावा, ही अपेक्षा तर आता निव्वळ पुस्तकी सुभाषितच ठरली आहे.

जनसेवेसाठी प्रशासकीय सेवा हे फक्त मुलाखतकारांवर इम्प्रेशन टाकण्यासाठीच झोकदार सुभाषित आहे. मुलाखत घेणा-या व देणा-या या दोघांनाही त्यातील फोलपणा पक्का ठाऊक असतो. मात्र, तरीही प्रशासकीय सेवेचे स्वप्न उराशी बाळगून जे लाखो तरुण रात्रंदिवस प्रामाणिकपणे मेहनत करतात, अभ्यास करतात, त्यांच्या या स्वप्नासाठी त्यांचे पालक आपले आर्थिक सर्वस्व पणाला लावतात त्या सगळ्यांची नियुक्तीत पारदर्शकता, प्रामाणिकपणा हवा ही किमान अपेक्षाही पूर्ण होत नसेल तर तो त्यांच्यावरचा घोर अन्याय नाही का? पूजा खेडकरसारखी प्रकरणे जर या व्यवस्थेत घडत असतील तर देशातील सामान्यांनी या व्यवस्थेवर विश्वास ठेवायचा तरी कसा? पूजा खेडकर व तिच्या कुटुंबियांचे कायद्याने जे व्हायचे ते होईलच.

मात्र, या प्रकरणाने केंद्रीय लोकसेवा आयोगासह एकूणच देशातील व्यवस्थेच्या पारदर्शकता व प्रामाणिकपणावर जे प्रश्नचिन्ह निर्माण केले त्याचे काय करायचे? हा खरा प्रश्न! देशाचे कर्तेधर्ते व धोरणकर्ते म्हणून सरकारला याचे उत्तरदायित्व स्वीकारून व्यवस्थेत निर्माण झालेल्या फटी, खड्डे, पळवाटा, त्रुटी तातडीने दूर कराव्या लागतीलच पण व्यवस्थेतून जे मस्तवाल नोकरासुर तयार झाले आहेत त्यांची मस्ती कुठलीच दयामाया न दाखवता उतरवावी लागेल. थोडक्यात ही व्यवस्थेची स्वच्छता मोहीमच आहे. सरकार ती हाती घेणार का? याचीच देशाला आता प्रतीक्षा आहे, हे निश्चित!

# त्या काँग्रेस आमदारांवर दोन दिवसांत कारवाई

## दिल्लीत हालचालींना वेग, विधान परिषद निवडणुकीत केली होती गद्दारी

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानपरिषद निवडणुकीत फुटलेल्या आमदारांवर कारवाई करण३यात येणार आहे. नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसची ७ मतं फुटल्याचे दिसून आले. आता काँग्रेसच्या फुटलेल्या आमदारांवर कठोर कारवाई होणार आहे. सातही आमदारांना पक्षातून निलंबित करण्याची कारवाई होण्याची शक्यता आहे. या सातही आमदारांवर दोन दिवसात कारवाई होणार आहे. येत्या दोन दिवसात मल्लिकार्जुन खर्गे आणि के. सी. वेणुगोपाल या संदर्भात घोषणा करणार आहे.**

विधानपरिषदेत निवडणुकीत ज्या आमदारांनी पक्षाच्या विरोधात जाऊन मतदान केलं आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची महत्त्वाची बैठक देखील झाली. या मागणीनंतर फुटीर आमदारांवर तात्काळ कारवाई होण्याची दाट शक्यता आहे. काँग्रेसच्या या फुटीर आमदारांवर काय कारवाई करणार याची माहिती येत्या दोन दिवसांमध्ये पुढे येणार आहे. चंद्रकांत हांडोरे यांच्या निवडणुकीत मत फुटल्यानंतर या निवडणुकीत काँग्रेसने सावध भूमिका घेतली होती. या निवडणुकीत जे आमदार फुटलेले आहेत त्यांचे पुरावे काँग्रेसकडे असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पक्षाला शिस्त लावण्यासाठी काँग्रेसचे हाय कमांड कठोर कारवाई करणार आहे.

# जालन्यासह बऱ्याच लोकसभा मतदार संघात दगाफटका

## भाजपच्या बैठकीत अजित पवार गट- शिंदे गटाबाबत नेत्यांच्या मनातील खदखद बाहेर

**मुंबई । प्रतिनिधी**

**महायुतीत नाराजीनाट्य असल्याच्या चर्चांना गेल्या काही दिवसांपासून उधाण आले आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित यश मिळाले नव्हते. तसेच, राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या मुखपत्रातून अजित पवारांना युतीत घेऊन चूक केली, असे म्हणत भाजपला सुनावले होते. त्यातच जालनासह बऱ्याच लोकसभा मतदार संघात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी मदत केली नसल्याचे सांगून भाजप कोअर कमिटीच्या बैठकीत नेत्यांच्या मनातील खदखद अखेर बाहेर आली.**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १८ आणि १९ जुलै रोजी भाजपची बैठक पार पडत आहे. या बैठकीला महाराष्ट्राचे प्रभारी व सहप्रभारी दोघेही उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत निवडणुकीच्या तयारीसाठीच्या रोड मॅपसह जागावाटप आणि मित्रपक्षावरदेखील चर्चा झाली. तेव्हा भाजपच्या काही नेत्यांकडून अजित पवार आणि एकनाथ शिंदेंच्या गटाबाबत तक्रारी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजित पवार आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांकडून लोकसभेला मदत झाली नसल्याची तक्रार भाजपच्या काही नेत्यांनी केली आहे. अजित पवार गटाच्या नेत्यांनी काही मतदारसंघात अपेक्षित मदत केली नाही, त्यांच्या पक्षाचे आमदार प्रमुख नेते मविआच्या उमेदवारांना निवडणुकीत मदत करत असल्याच्या तक्रारी काही नेत्यांनी मांडल्या आहेत. भाजपच्या नेत्यांनी यावेळी दिंडोरी, सातारा, सांगली, सोलापूर आणि पुणे मतदारसंघाचे उदाहरण देत अजित पवार गट आणि शिंदे गटाच्या तक्रारी केल्या आहेत. शिंदेंच्या सेनेकडून देखील जालना, परभणीत मदत न झाल्याची नेत्यांची बैठकीत तक्रार करण्यात आली. दगाफटक्यामुळे जालना हा वर्षानुवर्षे निवडून आणणारा मतदारसंघ आपण मागवला, असेही बैठकीत सांगण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. लोकसभा निवडणुकीत जागा वाटपाचा घोळ झाला. त्याचा फटका बसल्याचा देखील काहींचा सूर असल्याची माहिती आहे. मात्र विधानसभा निवडणुकीत याची खबरदारी घेत मित्रांना देखील सूचना द्यावा, असे नेत्यांचे आवाहन आहे. जागावाटप करून लवकरात लवकर उमेदवार जाहीर करा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

### विधानसभेला महायुती म्हणूनच सामोरे जायचे

विधानसभा निवडणुकीला महायुती म्हणूनच सामोरे जायचे, असा निरोप केंद्रीय पक्षश्रेष्ठींनी राज्यातील भाजप नेत्यांना दिला आहे. महायुती म्हणून ताकद दाखवा, सोबतच भाजपची ताकद देखील प्रकर्षानं त्यावेळी दिसली पाहिजे यासाठी प्रयत्न करा, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. दरम्यान, महायुतीच्या जागा वाटपाचा फॉर्म्युला तिन्ही पक्षाचे प्रमुख नेते एकत्रित बैठकीत ठरवणार.

# आरटीई प्रवेशाबाबतचा राज्यसरकारने काढलेला अध्यादेश मुंबई हायकोर्टाकडून रद्द; राज्य सरकारला मोठा दणका

## इंग्रजी शाळा आणि सरकारला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील-उच्च न्यायालय

**बीड । प्रतिनिधी**

**वंचित आणि आर्थिक दुर्बल घटकातील मुलांसाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया सरकारकडून राबवली जाते. मात्र यंदा राज्य शासनाने आरटीईच्या नियमात काही बदल करत त्याबाबतचा नियमबाह्य अध्यादेश फेब्रुवारीत काढण्यात आला होता.**

मात्र हा अध्यादेश मुंबई हायकोर्टाकडून रद्द करत राज्य सरकारला दणका दिला आहे. शालेय प्रवेशाबाबत अचानक अशाप्रकारे निर्णय घेणं घटनाबाह्य असल्याचं हायकोर्टानं म्हणत राज्य सरकारला फटकारलं आहे. खासगी विनाअनुदानित शाळांना आरटीई प्रवेश प्रक्रियेतून वगळण्याबाबत ९ फेब्रुवारीला राज्य सरकारनं जारी केलेल्या अधिसूचनेला हायकोर्टाने स्थगिती दिली होती. राज्य सरकारनं खासगी शाळांऐवजी वंचित घटकांतील मुलांना सरकारी अनुदानित शाळेत प्रवेश घ्यावा यासाठी नियमांत बदल केले होते. हा अध्यादेश गोरगरीब , वंचित आणि आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना श्रीमंताच्या मुलांसोबत शिक्षण घेण्या पासून वंचित ठेवणारा होता. आणि तो केवळ आणि केवळ संस्थाचालकांच्या हित जपणारा होता. सरकारच्या या निर्णयाविरोधात पालक, सामाजिक कार्यकर्ते , शिक्षण प्रेमी आणि विविध संघटनांनी हायकोर्टात आव्हान दिलं होतं. मे महिन्यात या अध्यादेशाला स्थगिती देत हायकोर्टानं या प्रकरणावर सुनावणी घेतली होती. त्यात अंतिम निकाल सुनावताना न्या. देवेंद्रकुमार उपाध्ये यांच्या खंडपीठाने म्हटलं की, राज्य सरकारने अचानकपणे आरटीई प्रवेश प्रक्रियेबाबत निर्णय घेणे हे घटनाबाह्य आहे. कायद्यात रातोरात बदल करता येणार नाही त्यामुळे हा अध्यादेश आम्ही रद्द करतोय असं म्हटलं. दरम्यान, आरटीई अंतर्गत शाळांच्या परिसरातील वंचित आणि दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे खासगी शाळांनाही आणि राज्य सरकारलाही बंधनकारक राहील असे न्यायलयाने म्हंटले आहे.



### आरटीई प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची आर्थिक लूट आणि अडवणूक होणार नाही याची काळजी शिक्षणाधिकारी यांनी घ्यावी - मनोज जाधव

सर्वप्रथम आम्ही न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत करतो, आता ही प्रवेश प्रक्रिया लवकरात लवकर सुरू करून गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. आधीच न्यायालयीन प्रक्रियेमुळे खूप उशीर झाला आहे. त्याच बरोबर आरटीई अंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थांच्या पालकांची शाळांकडून अडवणूक केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच काही शाळा आरटीई अंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकडून संगणक सुविधा, पाणी, खेळाचे मैदान, प्रवेश अर्ज इत्यादी नावाखाली अडवणूक करून पैसे उकळत आहेत. यांच्यावर शिक्षण अधिकारी यांनी कडक कारवाई करत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.

## पान १वरून...

### महाराष्ट्रासह १५ राज्यात मकापासून

येत आहे. कारण इथेनॉल निर्माण केलं जात आहे. हे इथेनॉल जात आहे. त्यामुळे देशातील आयात कमी होऊन शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. शेतकरी केवळ नाही तर ऊर्जा होणार आहे. परंतू आवश्यक तेवढे उत्पादन होत नाही. अशा परिस्थितीत पुरेशा प्रमाणात उत्पादनाची गरज आहे. केंद्र सरकारनं उद्योगांच्या क्षेत्रात मका उत्पादन हा प्रकल्प सुरू केला आहे. ज्याची जबाबदारी आयसीएआर अंतर्गत भारतीय मका संशोधन संस्थेला देण्यात आली आहे. या अंतर्गत मक्याचे उत्पादन वाढवण्यात येणार आहे. या मोहिमेत शेतकरी, आणि बियाणे उद्योग यांना एकत्र घेऊन काम केले जाणार आहे. या अंतर्गत शेतकऱ्यांना अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचे बियाणे वाटप करण्यात येत आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, ओडिशा आणि उत्तर प्रदेशमध्ये आतापर्यंत डीएचएम-११७ आणि डीएचएम-१२१ वाणांचे ३००० किलो बियाणे वितरित करण्यात आले आहे.

---------------

### पूजा खेडकरांवर दिल्लीत

असताना ओबीसी नॉन क्रिमी लेअर सर्टिफिकेटही त्यांनी काढल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात कार्मिक मंत्रालयाने एक समिती नेमली असून दोन आठवड्यात त्याचा अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच युपीएससीने दिलेल्या तक्रारीनंतर दिल्ली क्राईम ब्रँचने पूजा खेडकर विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. आता या प्रकरणाचा तपास दिल्ली पोलिस करणार असल्याने पूजा खेडकर यांचे पाय आणखी खोलात जाणार असल्याचे दिसते. त्यांच्याकडे बोगस रेशन कार्ड असल्याचेही आता उघड झाले आहे.

**यूपीएससीची कारणे दाखवा नोटीस**

दरम्यान, पूजा खेडकरांचा राज्यातील प्रशिक्षणाचा कालावधी संपवण्यात आला असून २३ जुलै पर्यंत त्यांना मसुरीतील प्रशिक्षण केंद्रात हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच यूपीएससीने त्यांना एक कारणे दाखवा नोटिसही बजावली असून त्यामध्ये खोटे प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी कारवाई का करू नये असा सवाल विचारला आहे. तसेच पुणे जिल्हाधिकाऱ्यांवर खेडकर यांनी छळ केल्याचा आरोप केला होता, यासंदर्भात गैरहजर राहील्याने पुणे पोलिसांची दुसरी नोटिसही त्यांना देण्यात आली आहे.

**पूजा खेडकरांनी वाशिम सोडले**

तब्बल ७२ तासांनी पूजा खेडकर यांनी वाशिमचे शासकीय विश्रामगृह सोडले आहे. पुणे पोलिसांनी पूजा खेडकर यांना चौकशीसाठी नोटीस बजावली होती. त्या चौकशीला पूजा अद्याप हजर राहिलेल्या नाहीत. वाशिमचं शासकीय निवासस्थान सोडल्यानंतर पूजा खेडकर छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने रवाना झाल्याची माहिती आहे.

-----------

### रेल्वेच्या कामाला गती

बाजूने देखील सुरुवात करण्यात यावी, परळी ते मुंबई स्वतंत्र एक्सप्रेस गाडी सुरू करण्यात यावी, लातूर एक्सप्रेस परळी पर्यंत वाढवण्यात यावी, नांदेड-पनवेल एक्सप्रेस प्रवाशांच्या व भाविकांच्या सोयीसाठी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पर्यंत वाढवण्यात यावी. घाटनांदूर मार्गाने जाणाऱ्या एक्सप्रेस गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा, घाटनांदूर परिसरातील राजा पांडे यांच्या शेतातून जाणाऱ्या रेल्वे रुळासाठी अंडरपास द्यावा, चोपणवाडी उड्डाणपूल, परळी शहर बायपास, उड्डाणपूल, पादचारी मार्ग आदी ठिकाणी अंडरपास उभे करण्यात यावेत, यांसह बीड जिल्ह्यातील महत्वाच्या रेल्वे विषयक मागण्यांबाबत निवेदनासह सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शिष्टमंडळात ना.धनंजय मुंडे, आ.पंकजाताई मुंडे, ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, अय्युब खान पठाण, अजीज कच्छी, इस्माईल पटेल, शंकर आडेपवार, विजय भोयटे, केशव गायकवाड, अनंत इंगळे, दीपक तांदळे, अय्युब बागवान, गफार बागवान, इलियास बागवान, जावेद कुरेशी, रवी मुळे, शकील कच्छी, जाफर बागवान, अजीज पटेल, राजू शेख, महेंद्र रोडे, रेल्वे संघर्ष समितीचे जी.एस.सौंदळे गुरुजी यांसह आदी उपस्थित होते. कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना परळी स्थित पाचवे ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ प्रभुंच्या दर्शनाचे निमंत्रणही दिले आहे.

-----------

### आगामी विधानसभा निवडणुका शिवसेना

शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला असून प्रत्येक तालुक्यामध्ये विधानसभेमध्ये व गावमध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख माननीय उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांना मानणारा व त्यांच्यावर प्रेम करणारा मोठा वर्ग आहे बीड जिल्ह्यात शिवसेनेसाठी वातावरण अत्यंत पोषक असून बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात शिवसेनेने जर उमेदवार उभे केले तर शंभर टक्के यशाची खात्री असल्याचे सांगितले व बीड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व विधानसभा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा आपल्या संपूर्ण ताकतीने व जोमाने लढवणार असून तो जिंकल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन संपर्कप्रमुख परशुराम जाधव यांनी केले व आढावा बैठकीच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या शिवसेनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांना गाव,सर्कल व बूथ स्तरावर जोमाने कामाला लागण्याच्या सूचना केल्या यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित माजी आमदार सुनील दादा धांडे,सहसंपर्कप्रमुख डॉक्टर लक्षराज सानप,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे,जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे,बीड शहर प्रमुख शेख निजाम भाई यांची समायोजित भाषणे झाली व उपस्थित असणाऱ्यांना मार्गदर्शन करून कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख परमेश्वर जी सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांनी जो विश्वास बीड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यावर टाकलेला आहे तो विश्वास कधीही तुटू देणार नाही व बीड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व विधानसभेच्या जागा जिंकून शिवसेनेचा भगवा बीड जिल्ह्यावर फडकवणार असल्याचे सांगितले यावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी बीड जिल्ह्यातील शिवसेना व शिवसैनिक हे बाळासाहेबांच्या विचारांचे कडवट शिवसैनिक असून उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाचे काटेकोर पालन करून बीड जिल्ह्यातील सर्व विधानसभेवर शिवसेनेचा भगवा फडकवल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन केले. यावेळी उपजिल्हाप्रमुख आदिनाथ खेडकर,उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळुंके, उपजिल्हाप्रमुख हनुमान जिजा जगताप,उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख बंडू पिंगळे, उपजिल्हाप्रमुख शिवाजी दादा कुलकर्णी, उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्वार, जिल्हा समन्वयक अशोक गाढवे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, बीड तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण,शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, माजलगाव तालुका प्रमुख पप्पू धरपडे,केज तालुका प्रमुख अशोक जाधव, अंबाजोगाई तालुका प्रमुख बाळासाहेब शेप, परळी तालुका प्रमुख भोजराज पालीवाल सह बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या उपस्थित होते.

------------

### विरोधकांना चोख उत्तर देणार

राज्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, माधव भंडारी, चव्हाण, अतुल भातखळकर आणि राम कदम हे सहा नेते प्रतिक्रिया देणार आहेत, अशी घोषणा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंनी केली आहे.

**महायुतीत भाजपने १७० ते १८० जागा लढण्याचा नेत्यांचा आग्रह**

लोकसभेच्या निवडणुकीत बसलेला फटका लक्षात घेता विधानसभेच्या निवडणुकीत भाजपने जास्तीत जास्त म्हणजे १७० ते १८० जागा लढाव्यात असा आग्रह पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी धरल्याची माहिती आहे. महाराष्ट्र प्रभारी, केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय मंत्री आश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली भाजपच्या कोअर कमिटीची बैठक मुंबईत झाली.

**विभागवार बोलण्यासाठी २० नेत्यांची तगडी टीम**

विभागवार बोलण्यासाठीही भाजपकडून २० नेत्यांच्या तगड्या टीमची घोषणा करण्यात आली आहे. भाजपच्या विभागीय टीममध्ये केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, माजी केंद्रीय मंत्री भारती पवार यांचा समावेश आहे.

**१७०-१८० जागांचा आग्रह**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून विधानसभेसाठी १०० जागांची मागणी भाजपकडे केली होती. मात्र शिंदे गटाची ही मागणी मान्य केली तर २०१९ पेक्षा कमी जागा भाजपला लढाव्या लागतील. त्यामुळे १७० ते १८० जागांपेक्षा कमी जागांवर भाजपने लढू नये असा आग्रह स्थानिक भाजप नेत्यांनी धरल्याची माहिती आहे. जेवढ्या जास्त जागा लढू तेवढा आधिक फायदा होईल असे मत भाजपच्या नेत्यांचे आहे. पुण्यात होणाऱ्या एक दिवसीय संमेलनाच्या आधी भाजप विधानसभेच्या किती जागा लढेल हे निश्चित होईल.

----------

### जगातील सर्वात उंच ब्रीजवर

४० किलोपर्यंतची स्फोटके आणि ८ रिश्टर स्केलपर्यंतचे भूकंप सहन करू शकतो. पाकिस्तानी सीमेपासून त्याचे हवाई अंतर केवळ ६५ किमी आहे. हा पूल उघडल्यानंतर काश्मीर खोरे भारताच्या इतर भागांशी प्रत्येक मोसमात गाड्यांद्वारे जोडले जाईल. यूएसबीआरएल प्रकल्प १९९७ मध्ये सुरू झाला. याअंतर्गत २७२ किमीचा रेल्वेमार्ग टाकण्यात येणार होता. आतापर्यंत विविध टप्प्यांत २०९ किमीची लाईन टाकण्यात आली आहे. या वर्षाच्या अखेरीस, रियासी ते कटरा जोडणारी शेवटची १७ किमीची लाईन टाकली जाईल, त्यानंतर प्रवाशांना जम्मूमधील रियासी ते काश्मीरमधील बारामुल्ला असा प्रवास करता येईल.

----------

### वसंत मोरे यांना जीवे

कार्यकर्त्याने वसंत मोरे यांच्या भाच्याला फोनवरुन वसंत मोरे यांना मारण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. वसंत मोरे यांचा भाचा प्रतिक कोडितकर आणि कथित मनसे कार्यकर्त्याच्या फोनवरील संभाषणाची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

cmyk

## शिवसंग्रामचे सुहास पाटील यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

बीड । प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे साहेब यांच्या सामाजिक व राजकीय चळवळीचे साक्षीदार तथा शिवसंग्रामचे बीड शहराध्यक्ष सुहास पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप , उद्योगपती नितीन कोटेचा, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे, एम.आय.एमचे जिल्हाध्यक्ष शेख शफीक भाऊ, शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद,दादासाहेब मुंडे,सी. ए.भानुदास जाधव, अनिल घुमरे, पत्रकार शशि केवडकर, वैभव स्वामी, स्वप्निल भैया गलधर, महेश धांडे, मा. पं. स. सदस्य पांडुरंग होमकर,माजी नगरसेवक रवि मानूरकर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, यांच्यासह शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी सपत्नीक सुहास पाटील यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. २० जुलै २०२४



# विशाळगड हिंसाचाराचे प्रकरण हे महाराष्ट्राला काळिमा फासणारे ; गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा - राजेसाहेब देशमुख

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एकिकडे देशात महाराष्ट्राची ओळख एक पुरोगामी राज्य अशी असताना दुसरीकडे मात्र राज्यात समाजस्वास्थ्य बिघडविणाऱ्या नको त्या घटना, प्रकार दररोज कुठे ना कुठे घडत आहेत. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन राज्य केले म्हणूनच त्यांना लोकराजे म्हणतात. पण, त्यांच्याच करवीर नगरीत सामाजिक सलोखा बिघडविण्याचे पाप केले जात आहे आणि तेही केवळ स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी, हे अत्यंत निंदनीय, दुर्दैवी आणि चिंताजनक आहे. विशाळगड हिंसाचाराचे प्रकरण हे महाराष्ट्राला काळिमा फासणारे आहे, त्यामुळे हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरलेल्या महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी केली आहे.

विशाळगड प्रकरणी बीड जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे की, विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नांवाखाली गजापूर गावात एकाच धर्माच्या लोकांवर हल्ले करून त्यांच्या घरांचे, दुकानांचे व मालमत्तांचे प्रचंड नुकसान करण्यात आले आहे. झुंडशाहीचा हा प्रकार महाराष्ट्राला कदापीही शोभणारा नाही, या दंगेखोरांच्या तात्काळ मुसक्या आवळा व कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे केली आहे. विशाळगड प्रकरणी काँग्रेसच्या वतीने प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांनी ही मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. अशी माहिती देवून जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र ही साधू-संतांची, थोर पुरूषांची, विचारवंत व समाजसुधारकांची भूमी आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकर



यांच्या विचारांवर चालणारे पुरोगामी राज्य अशी महाराष्ट्राची संबंध देशात ओळख आहे. पण, मागील काही दिवसांपासून आपल्या राजकीय फायद्यासाठी सत्ताधारी पक्षातील काही नेते हे अत्यंत प्रक्षोभक वक्तव्ये करून राज्यात हिंदू-मुस्लिम तेढ निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. हे कुठे तरी थांबले पाहिजे, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जाणीवपूर्वक धार्मिक तेढ निर्माण करण्याचा हा प्रकार अत्यंत घातक व महाराष्ट्राच्या प्रतिमेला कलंक लावणारा आहे, असे देशमुख यांनी सांगितले आहे. विशाळगडावरील अतिक्रमणे काढली पाहिजेत याबाबत कुणाच्याही मनात दुमत नाही. पण, आपले दैवत वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज यांचा गड-किल्ल्यांचा वारसा ही आपण जपला पाहिजे. अतिक्रमणाचे हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, न्यायालयातील सुनावणी वेळी सरकारी वकील उपस्थित नसतात, सरकार पक्षाकडूनच वेळकाढूपणा केला जात असताना अचानक अशा काही हालचाली करून अतिक्रमणाचा मुद्दा चव्हाट्यावर आणला गेला. विशाळगडावरील अतिक्रमणाच्या नांवाखाली १४ तारखेला विशाळगडापासून ४ किलोमीटर दूर असलेल्या गजापूर गावातील एका धर्माच्या लोकांच्या घरांवर हल्ले करण्यात आले, मारहाण करण्यात आली. हा प्रकार माणुसकीला काळिमा फासणारा आहे. विशाळगडावरील अतिक्रमण व गजापूर गावातील दंगल हे दोन्ही वेगळे विषय आहेत, त्यामुळे यापुढे जर पुरोगामी महाराष्ट्र असे प्रकार थांबले नाहीत तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा जिल्हाध्यक्ष देशमुख यांनी यावेळी दिला आहे.

### गृहमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा

महाराष्ट्राचे गृहमंत्री ना.फडणवीस यांनी केलेले विधान हे राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी वा दंगेखोरांवर कारवाई करण्यासंदर्भातील नसून ते विशिष्ट धर्माला भीती घालण्याचे व या प्रकरणाला वेगळा रंग देणारे आहे असे दिसून येत आहे, गृहमंत्र्यांचे विधान हे एकप्रकारे दंगेखोरांना पाठीशी घालणारे आहे, आम्ही या विधानाचाही निषेध करतो. १४ जुलै रोजी जो हिंसाचार झाला ते सरकार आणि प्रशासनाचे फक्त अपयशच नाही तर प्रशासनाच्या पाठबळाने झालेला गुन्हा आहे. त्यामुळे हिंसाचार रोखण्यात अपयशी ठरलेल्या महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा.

– राजेसाहेब देशमुख (अध्यक्ष, बीड जिल्हा काँग्रेस कमेटी.)

## शहरातील महामार्गावर मोकाट जनावरांची दहशत



किल्ले धारूर । प्रतिनिधी

खामगाव पंढरपूर महामार्गावर धारूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक व केज रोड परिसरात महामार्गावर मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे जनावरांचे कळप रस्त्यावर ठिय्या मांडून बसतात त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे या मोकाट जनावरांचा नगरपरिषदेने बंदोबस्त करावा अशी मागणी वाहनधारक व शहरातील नागरिक करत आहेत.

शहरातील मुख्य रहदारीच्या रस्त्यावर मोकाट जनावरे रस्त्याच्या मधोमध बसले असतात त्यामुळे या रस्त्यावरून वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत काही वेळा जनावरे अचानक धुडगूस घालतात त्यामुळे या रस्त्यावरून पाई चालणाऱ्या महिला लहान मुले नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे तसेच वेगाने येणाऱ्या वाहनां समोर अचानक येतात त्यामुळे अपघात होण्याची शक्यता अधिक आहे अलीकडच्या काळात मोकाट जनावरांचा रस्त्यावर वावर वाढला असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून जावे लागत असल्यामुळे या मोकाट जनावरांचा नगर परिषदेने बंदोबस्त करावा करणारे अपघात टाळावे अशी मागणी शहरातील वाहनधारक व नागरिक करत आहोत.

## सेवा आणि भक्तीचा संगम परतीच्या वाटेवरील हजारो वारकऱ्यांनी सोडली बारस

किल्ले धारूर । प्रतिनिधी

विठ्ठल भक्तीचा ध्यास आणि विठ्ठल दर्शनाची आस घेऊन शेकडो किलोमीटर ची पायपीट करून पंढरपुरात आषाढी एकादशी दिवशी विठ्ठलाचे दर्शन घेऊन हजारो वारकऱ्यांनी आपला परतीचा प्रवास सुरू केला या परतीच्या वारकऱ्यांसाठी धारूर शहरातील वारकरी मित्र मंडळ व विठ्ठल भक्तांच्या वतीने खामगाव पंढरपूर या महामार्गावरून परतणाऱ्या वारकऱ्यांसाठी जाधव मंगल कार्यालय येथे बारा तास अन्नछत्र उभारून वारकऱ्यांची सेवा केली. धारूर येथे विठ्ठल भक्त मित्र मंडळाने यापुढेही वारकऱ्यांसाठी दरवर्षी



अन्नछत्र उभारून सेवा करणार असल्याचां संकल्प केला १०,००० वारकऱ्यांनी या अन्नछत्रांमध्ये बारस सोडली.

आरोग्य विभागाकडून दिवसभर मोफत आरोग्य तपासणी

धारूर तालुका आरोग्य विभागाकडून परतीच्या मार्गावर असलेल्या हजारो वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉक्टर शशांक वाघमारे तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर राजे लोमटे यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली गुरुवारी सकाळी आठ वाजेपासून ते संध्याकाळी आठ वाजेपर्यंत डॉ.विजय ,डॉ. एस. एस. लातूरकर डॉ. शेख परवेज डॉ.अरविंद नीक्ते ,ठोंबरे, व्हीएस काळे , पूजा खाडे, रोहन वाघ, प्रकाश साखरे, प्रल्हाद कातकडे, शेख ,शैलेश लोंढे , व डॉक्टर कर्मचाऱ्यांनी या शिबिरामध्ये भाग घेऊन १२०० वारकऱ्यांची तपासणी करून उपचार केले. अन्नछत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे मान्यवरांनी कौतुक केले ,धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी यांनी शिबिर आयोजकांचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या अन्नछत्र व आरोग्य शिबिर संपन्न करण्यासाठी वारकरी मित्र मंडळाच्या शेकडो स्वयंसेवकानी दिवसभर श्रमदान करून यशस्वी केले.

## माजलगावमध्ये उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर शांततेत धरणे आंदोलन



माजलगाव । प्रतिनिधी

विशालगड (गजापूर) येथे मज्जिद वर व दर्गावर हल्लेखोरावर यु.ए.पी.ए.कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी निष्पर्कीय जिल्हाधिकारी व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करणे मुस्लिम आरक्षण कायदा तयार करणे प्रत्येकी पीडित कुटुंबांना दहा लक्ष रुपये ची तात्काळ मदत करणे याकरिता उपविभागीय अधिकाऱ्यालयासमोर सकल मुस्लिम समाज यांनी शांततेत निषेध आंदोलन करण्यात आले यावेळी बहू संख्येने मुस्लिम समाज उपस्तित होता.

## पान ६ वरून...

### मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत

०/०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे किंमत ५ कोटी ६९ लक्ष रूपये, ६)प्रजिमा- ०१ पिंपरखेड ते कुंभारवाडी रस्ता ग्रा. मा. ४७ कि.मी. ०/०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे किंमत ४ कोटी ३४ लक्ष रूपये, ७)प्रामा- १६ ते मैंदवाडी- देवळाली रस्ता ग्रामा १९ कि. मी. ०/०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे ४ कोटी ७४ लक्ष रूपये, ८)प्रजिमा- ०१ कुंबेफळ - बाळेवाडी रस्ता ग्रामा ८१ कि. मी. ०/०० ते ४/५०० मध्ये सुधारणा करणे किंमत ६ कोटी ४९ लक्ष रूपये, ९)रा. मा. ७० ते बळेवाडी प्रजिमा- १२ पर्यंत रस्ता ग्रा. मा. १७५ कि. मी. ०/०० ते ३/१०० मध्ये सुधारणा करणे किंमत ४ कोटी ५३ लक्ष रूपये, १०)प्रामा १६ उंदरखेल ते कारखेल खु. जवळ ग्रा. मा. ४५ कि. मी. ०/०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे किंमत ४ कोटी २८ लक्ष रूपये, ११)प्रजिमा- ०२ ते इमणगाव ते शिंदेवस्ती रस्ता ग्रामा २६० कि. मी. ०/०० ते २/२५० मध्ये सुधारणा करणे किंमत ३ कोटी १४ लक्ष रूपये या रस्त्यांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -२ ( बॅच - १) संशोधन व विकास अंतर्गत असते मतदार संघातील रस्त्यांची दर्जेन्नती करण्यासाठी ५१ कोटी रूपयांचा निधी मंजुर झाल्याची माहिती आ. बाळासाहेब आजबे यांनी दिली. मतदारसंघातील नागरिकांच्या वतीने आपण महायुती सरकारचे आभार मानत असून यापुढेही विकास कामासाठी आपण कधीबद्ध असल्याचे आमदार यांनी शेती सांगितले.

### विद्यार्थ्यांनौ संघर्षाची तयारी

सांगितले.या प्रसंगी नुकत्याच संपन्न झालेल्या १० वि, १२ वि बोर्ड परीक्षेतील तसेच राज्य स्तरावर आपल्या क्रीडा कौशल्याने छाप निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला.या व्याख्यानमालेचे प्रास्तावित मुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, सूत्र संचलन अंगद पेड्डेवाड तर आभार व्यक्त केशव दिक्षित यांनी केले.

### गजापुर (विशालगड) येथील मशिद

पुढील मागण्यांचे निवेदन मुस्लिम समाजाचे जमाते ए अमीर व उलेमा व मराठा समाज बांधव यांच्या हस्ते पाटोदा तहसीलदार निलावाड यांना देण्यात आले. १) युएपीए कायद्या अंतर्गत हल्लेखोरावर कडक कारवाई करण्यात यावी. २) संबंधित निष्क्रिय पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे. ३) झालेल्या हल्ल्यामधील धार्मिक स्थळे व मुस्लिम समाजाचे घराची शासनाकडून नुकसान भरपाई देण्यात यावी. ४)हल्ल्यामध्ये जखमी झालेल्या सर्वांना प्रत्येकी ०५ लाख रुपये सरकार तर्फे देण्यात यावे. ५) मुस्लिम समाजासाठी संरक्षण कायदे तात्काळ विशेष अधिवेशन बोलावून तात्काळ पारित करण्यात यावे. ६) महाराष्ट्रामध्ये विशेष करुन मुस्लीम समाजा सोबत असे प्रकार वाढतच आहेत, सरकाने याची दखल घ्यावी. व तसेच या सर्व घटनेची सखोल चौकशी सीआयडी मार्फत करण्यात यावी या व इतर मागण्यांचे निवेदन तहसीलदार पाटोदा यांना देण्यात आले. या वेळी पाटोदा तालुक्यातील मुस्लिम समाज बांधवांसह इतर समाज बांधव हि मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सर्व मुस्लीम समाज बांधवांचे व इतर समाज बांधवांचे सकल मुस्लिम समाजातर्फे आभार व्यक्त करण्यात आले

मुस्लिम - मराठा - मुस्लिम हएकी तोडण्याचा प्रयत्न हाणून पाडले पाहिजे - सुरेंद्र तिपटे

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा रहाणारा मुस्लिम समाज आहे.गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी मुस्लिम बांधव मराठा समाजाच्या आरक्षणासाठी खब्बीरपणे उभा राहिला आहे. या दोन्ही समाजांची एकी तोडण्याचा प्रयत्न दोन्ही समाजांनी हाणुन पाडले पाहिजे असे मराठा सेक बाबा तिपटे म्हणाले

### मुलाचा गळा दाबून

विनाकारण गोवण्यात आले व शेख इजान यास मारणारा व्यक्ती दुसरा असताना फक्त आई व मुलगा एकत्र असल्यामुळे फक्त संशयावरुन शेख नाजीया हीस आरोपी बनवले असा युक्तीवाद केला. तसेच प्रकरणाचा सखोल तपास तपासी अधिकारी यांनी केला नाही व दोषारोपपत्रामधील त्रुटी व कलम ३०२ भा.दं.वि. आरोपीवर लागत नाही असे मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सदरील बहुचर्चीत प्रकरणाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले होते, ॲड. अविनाश पं. गंडले यांनी आरोपीच्या वतीने केलेला अभ्यासपुर्ण युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपीची मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड यांनी दिनांक १८/०७/२०२४ रोजी जामीनवर मुक्तता केली. आरोपीच्या वतीने फौजदारी क्षेत्रातील प्रसिध्द विधीज्ञ ॲड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहीले त्यांना ॲड. ईमरान पटेल, ॲड. बप्पा माने, ॲड. किरण मस्के, ॲड. सुरक्षा जावळे, ॲड. सचिन गिरी,

ॲड. शुभम सरवदे. ॲड. राजेश शिंदे यांनी सहकार्य केले.

### कार्यकारी अभियंता मार्कंडेय

अनियमितता झाली आहे ती बाहेर निघू नाही म्हणून ते कार्यलयामध्ये उपस्थित राहत नसल्याचे कर्मचाऱ्याने संगीतले आहे. तसेच माहिती अधिकाराचे प्रथम अपिलाची सुनावणी घेण्यासही ते येत नाहीत. त्यांच्यावर शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याने कारवाई करावी अशी मागणी वंचितचे अजय सरवदे यांनी मुख्य अभियंत्याकडे केली आहे.

## गजापूर घटनेतील आरोपींवर कारवाईची मागणी

### भर पावसात भिजून आष्टीत मुस्लिम समाज एकवटला

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

कोल्हापूर येथील विशाळगडा पासून ३ किमी अंतरावर असलेल्या गजापूर आणि मुस्लिमवाडी येथे जमलेल्या दहशतवादी जमावाने अतिक्रमणाच्या नावाखाली मुस्लिम समाजाच्या लोकांची घरे, धार्मिक स्थळे व गाड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले आहे. यामध्ये घाबरलेल्या निरपराध लोकांना घरे सोडून पलायन करण्याची वेळ आली. सदरील घटना निंदनीय असून समस्त मुस्लिम समाजाच्या भावना दुखावणारी आहे. यामुळे घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कडक शासन करावे तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी या मागणीसाठी आष्टीतील मुस्लिम बांधवांनी भर पावसात मोटारसायकल रॅली काढून निषेध व्यक्त केला आहे.



रविवार दि.१४ जुलै रोजी छत्रपती संभाजी महाराजांनी विशाळगडा वरील अतिक्रमण काढण्यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले होते. गडाच्या पायथ्याशी असलेल्या गजापूर येथे संभाजी महाराज अधिकाऱ्यांशी बोलत असताना काही समाजविघातक वृत्तींनी गजापुर येथील मुस्लिम समाजाच्या घरांवर हल्ला करून त्यांच्या घरांची, गाड्यांची, लहान मुलांच्या खेळणीची व शिवकालीन असलेल्या रेहान मलिक दर्ग्याची तोडफोड केली आहे. या घटनेत निरपराध लोकांनावर जीव मुठीत धरून घरे सोडून जाण्याची वेळ आली. सदरील घटनेमुळे समस्त मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. गजापूर येथील घटनेच्या निषेधार्थ व नुकसान भरपाईच्या मागणीसाठी शुक्रवार दि १९ रोजी दुपारी दोन वाजता येथील ईदगाह मैदान ते तहसील कार्यालय अशी मोटरसायकल रॅली काढण्यात आली होती. सदरच्या घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी या मागणीचे निवेदन तहसीलदार प्रमोद गायकवाड यांना यावेळी देण्यात आले. यावेळी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज पंडित

गेवराई । प्रतिनिधी

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षीही गेवराई शहरात साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवानेते पृथ्वीराजपंडित यांची तर सचिव पदी ॲड. भगवान घुंबार्डे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आज झालेल्या बैठकीमध्ये सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवानेते पृथ्वीराजपंडित यांची तर उपाध्यक्ष पदी लक्ष्मण चव्हाण, मंजूर बागवान, ॲड. भगवान घुंबार्डे, सहसचिव पदी मधुकर वादे, कोषाध्यक्ष पदी साईनाथ सुरवसे, सहकोषाध्यक्ष पदी प्रवीण राऊत, कार्याध्यक्ष पदी धम्मपाल कांडेकर तर प्रसिद्धीप्रमुख पदी दिनकर शिंदे, अमोल वैद्य यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगून सर्वांना जयंती महोत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पृथ्वीराज पंडित यांनी यावेळी केले. यावेळी समाजबांधवासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा जनविश्वास सप्ताह साजरा करणार -डॉ.राऊत

आष्टी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री यांच्या गतिमान नेतृत्वाखाली नवीन राजकीय भूमिका घेऊन,सर्वसामान्य माणसांच्या आयुष्यात बदल घडवून आणता येईल.सर्वांनी महायुतीचा घटकपक्ष म्हणून ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतलेला आहे.युगपुरूष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 'रयतेचं राज्य' या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी व शिव-फुले-शाहू-

आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांचा वारसा ना.अजितदादा पवारांनी पुढे नेण्याचा प्रयत्न करीत या भुमिकेशी सातत्य राखले आहे.आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व संस्कारांचा वारसा घेऊन आपण ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी महाराष्ट्राच्या विकासासाठी कटीबध्द आहोत.यावर्षी दि.२२ ते २८ जुलै २०२४ या कालावधीत सर्वांनी आपल्या कणखर, गतिमान व प्रभावशील नेतृत्वाचा वाढदिवस ''जनविश्वास सप्ताह'' जोमाने व उत्साहाने साजरा करायचा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या दि. २२ ते २८ जुलै या कालावधीत जनविश्वास सप्ताह साजरा करावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा बीड जि.प.चे माजी अध्यक्ष डा.शिवाजी राऊत यांनी केले.



दि.२६ जुलै रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तालुका, जिल्हास्तरावर व गाव स्तरावर ना.अजितदादा पवार यांनी जो सर्वसामान्यांसाठी विकासाचा व सर्वसामान्यांच्या हिताचा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याची जनजागृती करण्यासाठी मेळावे,सभा आयोजित करावेत.या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील सर्व राष्ट्रवादी काँग्रेसचे मान्यवर नेते,पदाधिकारी,फ्रंटल व सेलचे प्रमुख व कार्यकर्ते यांना निमंत्रित करावे. कार्यक्रमामध्ये ना.अजितदादा पवार यांनी अर्थसंकल्पात घोषीत केलेल्या महत्वकांक्षी आणि क्रांतिकारी योजनांचा प्रसार व प्रचार करून त्या प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील यासाठी विशेष कार्यक्रम,मेळावे शिबिरे हाती घ्यावेत. त्यामध्ये महिलाशक्तीचा सन्मान - मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना (दरमहा १५०० रुपये), मुलींना मोफत उच्चशिक्षण आईचे नाव बंधनकारक, बळीराजाला दिलासा,४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज,कापूस सोयाबीन प्रतिहेक्टर ५ हजारांचे अनुदान,कांदा ३५० रु क्विंटल अनुदान,दूध ५ रुपये लिटर अनुदान, गृहिणींची कदर,दरवर्षी तीन मोफत गॅस सिलेंडर,२५ लाख लखपती दिदी करणार,दुर्बल घटकांचा आधार - संजय गांधी, श्रावणबाळ,निराधार,विधवा, दिव्यांग आणि वृद्धांना दरमहा १५०० अनुदान दिव्यांगांसाठी ३४,००० घरकुले,मौलाना आझाद महामंडळाला ५०० कोटींची हमी,

५ लाखापर्यंत आरोग्य विमा सरंक्षण रक्कम, वारकरी सन्मान -

वारीचा जागतिक वारसा युनेस्कोकडे नामांकन प्रस्ताव,वारकरी संप्रदाय महामंडळ,दिंडींना प्रत्येकी २० हजार रुपये शिवसन्मान -किल्ले रायगडावर दरवर्षी शिवराज्याभिषेक दिन उत्सव,१२ गड किल्ल्यांचा युनेस्कोकडे प्रस्ताव,महिला विभागाकडून दि.१० ते २२ जुलै २०२४ या दरम्यान विविध विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. तेच कार्यक्रम पुढेही सुरु ठेवण्यास हरकत नाही,युवक विभागाने जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धा कबड्डी स्पर्धा व कुस्ती राज्यस्तरीय इंडोर स्पर्धा, विद्यार्थी विभागाने ना.अजितदादा पवार यांच्या विकसनशील रोखठोक व गतिमान नेतृत्वाबद्दल वक्तृत्व स्पर्धा आयोजित करावेत,सामाजिक न्याय विभाग,अल्पसंख्यांक व ओ.बी.सी.विभागाने सामाजिक सलोखा साप्ताह व मेळावे घ्यावेत

सर्व विभागांनी रक्तदान व आरोग्य शिबीर घेऊन जास्तीत जास्त रक्तदान करावे,पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घ्यावेत, जिल्हाध्यक्षांनी पत्रकार परिषद घेऊन केलेल्या कार्यक्रमाची माहिती प्रिंट,इलेक्ट्रॉनिक मीडिया व सोशल मीडिया यांना द्यावी.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या दि.२२ ते २८ जुलै या कालावधीत जनविश्वास सप्ताह साजरा करावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा बीड जि.प.चे माजी अध्यक्ष डा.शिवाजी राऊत यांनी केले.

cmyk

# मकेचं उत्पादन वाढणार, इथेनॉल निर्मितीला मिळणार चालना

देशातील १५ राज्यांतील ७८ जिल्ह्यांमध्ये मका उत्पादन वाढवण्याची मोहीम सुरु झाली. शेतकऱ्यांना सुधारित वाणांचे बियाणे वाटप करण्यात येत असून सुधारित मका उत्पादनाचे प्रशिक्षण दिले जात आहे. इथेनॉलच्या उत्पादनासाठी मकेला मोठी मागणी आहे. त्यामुळं भारतीय कृषी संशोधन परिषद उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहे.

मकेचं महत्त्व वाढलं : आता बदलत्या काळात, मकेचं महत्त्व आणखी वाढले आहे. कारण ते केवळ मानवी अन्नासाठी उपयुक्त नाही तर ते आता पोल्ट्री उद्योगासाठी देखील उपयुक्त आहे. आता ते एक ऊर्जा पीक म्हणून देखील खूप वेगाने उदयास येत आहे. कारण मकेपासून इथेनॉल निर्माण केलं जात आहे. हे इथेनॉल पेट्रोलमध्ये मिसळले जात आहे. त्यामुळे देशातील पेट्रोलियमची आयात कमी होऊन शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. शेतकरी केवळ अन्नदाताच नाही तर ऊर्जा प्रदाताही होणार आहे. परंतू मकेचे आवश्यक तेवढे उत्पादन होत नाही. अशा परिस्थितीत पुरेशा प्रमाणात उत्पादनाची गरज आहे.

आतापर्यंत -११७ आणि -१२१ वाणांचे ३००० किलो बियाणे वितरित : केंद्र सरकारनं 'इथेनॉल उद्योगांच्या पाणलोट क्षेत्रात मका उत्पादन वाढ' हा प्रकल्प सुरू केला आहे. ज्याची जबाबदारी अंतर्गत भारतीय मका संशोधन संस्थेला देण्यात आली आहे. या अंतर्गत मक्याचे उत्पादन वाढवण्यात येणार आहे. या मोहिमेत एफपीओ, शेतकरी, डिस्टलरी आणि बियाणे उद्योग यांना एकत्र घेऊन काम केले जाणार आहे. या अंतर्गत





शेतकऱ्यांना अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचे बियाणे वाटप करण्यात येत आहे. आंध्र प्रदेश, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, ओडिशा आणि उत्तर प्रदेशमध्ये आतापर्यंत -११७ आणि -१२१ वाणांचे ३००० किलो बियाणे वितरित करण्यात आले आहे.

या १५ राज्यात वाढणार मकेचं उत्पादन? : या प्रकल्पाचे नेतृत्व करणाऱ्या आयआयएमआरचे वरिष्ठ मका शास्त्रज्ञ डॉ. एस.एल. जाट यांनी या प्रकल्पाबाबत माहिती दिली आहे. या प्रकल्पांतर्गत भारतातील १५ राज्यांमध्ये १५ क्लस्टर तयार करण्यात आली आहेत. याअंतर्गत ७८ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. तिथे मक्याचे उत्पादन वाढवण्याची मोहीम राबविली जाणार आहे. या १५ राज्यांमध्ये आंध्र प्रदेश, आसाम, पंजाब, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, ओडिशा, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा, तामिळनाडू, केरळ, उत्तराखंड, कर्नाटक आणि हरियाणा यांचा समावेश आहे. याअंतर्गत १५०० एकरात मका पेरायची आहे. त्यापैकी खरीप २०२४ हंगामासाठी ११४० एकर क्षेत्राचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी सर्व संबंधित जिल्ह्यांमध्ये सुधारित बियाणांचे वाटप करण्यात येत आहे. आत्तापर्यंत बायोसीड सोबत, ११७, १२२, १३०८, पायोनियर ३४०१, पायोनियर ३३९६, ९१४४,९१३३ आणि ९१७८ सारख्या कंपन्यांच्या बियांचा देखील समावेश करण्यात आला आहे.

कमी पाण्यात मकेचं जास्त उत्पादन : सरकारला इथेनॉलचे उत्पादन वाढवायचे आहे, असे भारतीय मका संशोधन संस्थेचे संचालक डॉ.हनुमान सहाय जाट यांनी सांगितले. यासाठी मक्याच्या अधिक उत्पादनाची गरज आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. इथेनॉल प्रामुख्याने ऊस, मका आणि कापणी केलेल्या तांदळापासून तयार केले जाते. पण ऊस आणि भात पिकांना जास्त पाणी लागते, तर मक्याला फार कमी पाणी लागते. त्यामुळे इथेनॉलसाठी कॉर्न वापरणे चांगले आहे. यासाठी, १५ राज्यांतील ७८ जिल्ह्यांमधील १५ पाणलोट क्षेत्रात सर्वोत्तम व्यवस्थापन पद्धती आणि सुधारित वाणांचा प्रसार करत आहे, जेणेकरून मक्याचे उत्पादन वाढेल.

मका उत्पादनात १० दशलक्ष टन वाढ करण्याचे सरकारचे लक्ष : कृषी मंत्रालयाने पुढील पाच वर्षांत मका उत्पादनात १० दशलक्ष टन वाढ करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. याचे कारण म्हणजे पोल्ट्री फीडसाठी मक्याची मागणी वाढत असून इथेनॉल उत्पादनासाठी उत्पादन वाढवणे अत्यंत आवश्यक आहे. कृषी मंत्रालयाच्या मते, २०२२-२३ मध्ये खरीप, रब्बी आणि उन्हाळी हंगामात ३८०.८५ लाख मेट्रिक टन म्हणजेच सुमारे ३८ दशलक्ष टन मक्याचे उत्पादन झाले आहे. यात वाढ करणे ही काळाची गरज आहे.

## विदर्भातील ६ जिल्ह्यात ६ महिन्यात ६१८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

यवतमाळ : गेल्या काही वर्षांपासून विदर्भात सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचं आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात कमी पडलं आहे का असा प्रश्न या निमित्याने विचारला जात आहे. एकट्या पश्चिम विदर्भाच्या सहा जिल्ह्यांमध्ये १ जानेवारी २१२४ पासून १० जुलै २०२४ दरम्यान तब्बल ६१८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. केंद्र सरकारने याविषयी गंभीर पावले उचलून आगामी बजेटमध्ये तात्काळ १ लाख कोटींचा एकात्मिक पश्चिम विदर्भ कृषी कल्याण कार्यक्रमाची घोषणा करावी, अशी मागणी पश्चिम विदर्भाच्या शेतकरी आत्महत्यांचा अभ्यास करणारे कार्यकर्ते किशोर तिवारी यांनी आज केलीय. किशोर तिवारी हे २०१५ ते २०२२ या काळात राज्य शासनाच्या वसंतराव नाईक शेती स्वालंबन मिशनचे प्रमुख होते. पश्चिम विदर्भातील यवतमाळ, वाशिम, अकोला, अमरावती, बुलढाणा आणि वर्धा या जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत तिवारी यांनी एकात्मिक अहवाल तयार केला होता. मात्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी अहवालाला केराची टोपली दाखवल्यामुळे शेतकरी आत्महत्येचा विषय गंभीर झाला असल्याचे तिवारी यांचे म्हणणे आहे.



पश्चिम विदर्भ हे क्षेत्र पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाच्या लागवडीचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. साधारण १९९८ पासून कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या समोर येऊ लागल्या आहेत आणि राज्य सरकारने हे कृषी संकट म्हणून दखल घेतली होती. २००१ साली तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील सरकारने राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना केली. मात्र ठोस उपाययोजना केली नव्हती. २००४ साली या आत्महत्या सत्राने रौद्र रुप धारण केले. २००४ साली तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी डॉ. स्वामिनाथन यांना दौरा करून अहवाल देण्यासाठी पाठविले. त्यानंतर २००५ साली विदर्भासाठी ४,८०० कोटींचे शेतकरी पॅकेज जाहीर करण्यात आले आणि २००८ मध्ये कृषी कर्ज माफ करण्यात आले होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांनी विदर्भातील शेतकरी अडचणीचे सर्व मुद्दे निवडणुकीचे मुद्दे बनवून आश्वासने दिली. मात्र नोकरशाहीतील भ्रष्टाचारामुळे सगळ्या घोषणा अयशस्वी झाल्या.

याचा फटका विदर्भातील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. या गंभीर विषयावर मानवतेच्या दृष्टीकोनातून तोडगा काढण्याची गरज असून अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आगामी अर्थसंकल्पात विदर्भातील शेतकऱ्यांसाठी १ लाख कोटींचा एकात्मिक पश्चिम विदर्भ कृषी कल्याण कार्यक्रम सादर करण्याची मागणी किशोल तिवारी यांनी केली आहे.

## महाराष्ट्रात ८६.९० टक्क्यांवर खरीप पेरण्या पूर्ण

### कृषी विभागाची माहिती, कोणत्या विभागात किती झाल्या पेरण्या?

राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या आता खरीप पेरण्यापूर्ण झाल्या आहेत. कृषी विभागाने दिलेल्या पीक पेरणी अहवालानुसार महाराष्टात ८६.९० टक्के पेरण्या पूर्ण झाल्या असून १२३ लाख ४१ हजार ५१७ हेक्टरवर या पेरण्या झाल्या आहेत. मागील वर्षी पावसाचा खंड पडल्यामुळे आणि त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. दरम्यान, यंदा जुन महिन्यात चांगला पाऊस झाल्याने आता खरीप पेरण्या जवळपास पूर्ण झाल्याचे चित्र आहे. सोयाबीनची ११५ टक्के पेरणी मागील पाच वर्षांच्या पेरण्यांच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात तब्बल ११५ टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीचे सोयाबीन अजूनही हमीभावाच्या प्रतीक्षेत असताना राज्यातील शेतकऱ्यांनी पुन्हा सोयाबीन पिकावर विश्वास दाखवला असून ११५ टक्के पेरणी केली आहे. ४७ लाख ७० हजार



४९ हेक्टरवर सोयाबीनची पेरणी यंदा झाली आहे.

खरीप ज्वारी ३१.२ टक्क्यांवर : राज्यात यंदा खरीप ज्वारीची ३१.२% वर पेरणी झाली असून ९० हजार १८८ हेक्टरवर शेतकऱ्यांनी खरीप ज्वारीचे पीक घेतले आहे. कोल्हापूरसह नाशिक विभागात खरीप ज्वारीची पेरणी अधिक झाली असून इतर विभागात तुलनेने कमी पेरणी झाल्याचे अहवालात नोंदवले आहे.

राज्यात कापूस पेरणी ९२.६३ टक्क्यांवर : राज्यातील शेतकऱ्यांनी ८ लाख ९१ हजार ४५६ हेक्टरावर यंदा कापूस पेरणी केली आहे. नागपूर विभागात ९६ टक्के क्षेत्रावर कापूस पेरला असून कोल्हापूर व पुणे विभागात १३ ते२० टक्के अधिक कापूस पेरणी झाली आहे.

मराठवाड्यात यंदा दिलासादायक चित्र : मागील वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरिपातील पीके धोक्यात आली होती. दरम्यान पावसाच्या खंडामुळे तसेच त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यातील बहुतांश भागात पिकांनी माना टाकल्या. राज्यभरात सध्या पावसाचा जोर वाढला असून खरीप पेरण्या बहुतांश ठिकाणी झाल्याचे चित्र आहे.

## रेशीम कीटकावरील उझी माशी नियंत्रण

रेशीम कीटकावरील उझी माशी चे नियंत्रण या विषयी माहिती असणे आवश्यक आहे. यामध्ये प्रामुख्याने उझी माशीचा प्रादुर्भाव कसा होतो, उझी माशीच्या नियंत्रणासाठी काय उपाय योजना आहेत याबद्दल सविस्तर माहिती घेण्याची गरज आहे.

उझी माशी विषयी : रेशीम कीटक व अळीवर उपजीविका करणारी परोपजीवी कीड म्हणजे उझी माशी (एक्झोरिस्टा बॉम्बीस) होय. या उझी माशीच्या प्रादुर्भावामुळे कोषांचे ५ ते १५ टक्क्यापर्यंत नुकसान होते. कर्नाटकमध्ये प्रादुर्भावाचे प्रमाण अधिक असून, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये प्रादुर्भाव दिसून येत आहे.

प्रजाती : १) भारतीय उझी माशी, २) जपानी उझी माशी, ३) काळी उझी माशी, ४) टसर उझी माशी.

नुकसानीचा प्रकार : उझी माशी एक किंवा दोन पांढऱ्या दुधाळ रंगाची, टाचणीच्या डोक्याच्या आकाराची अंडी ४ थ्या किंवा ५ व्या वाढीच्या अवस्थेतील अळीच्या त्वचेवर अंडी घालते. उझी माशीचा अंडी उबवण काळ ४८ ते ६२ तासांचा असतो. अंडी फुटून अळ्या (मॅगट) बाहेर पडल्यानंतर तिच्या छाती जवळील हुकच्या साहाय्याने छिद्र करून रेशीम कीटकाच्या शरीरात प्रवेश करतात. त्या ठिकाणी काळा डाग पडतो. या रेशीम कीटकांच्या शरीरावरील काळ्या डागा वरून उझी माशीचा प्रादुर्भाव झालेला ओळखता येतो.

संगोपन गृहाचे व्यवस्थापन : १) संगोपन गृहाच्या सर्व खिडक्यांना माशीच्या नियंत्रणासाठी सापळे लावावे. २) एक लिटर पाण्यात उझीनाशकाची एक गोळी टाकून द्रावण तयार करावे. पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिक ट्रेमध्ये हे द्रावण ओतावे. हे द्रावण पिवळ्या रंगाचे असते. हा ट्रे



खिडकीच्या आतील व बाहेरील बाजूस ठेवावा. ३) संगोपन गृह, कोष खरेदी केंद्र, अंडीपुंज निर्मिती केंद्र, धागानिर्मिती केंद्र अशा सर्व ठिकाणी अळ्या, कोष गोळा करून जाळून नष्ट करावेत. या सर्व ठिकाणच्या जमिनीच्या भेगा बुजवून घ्याव्यात. ४) गोळा केलेल्या अळ्या, कोष ०.५ टक्का डिटर्जंटच्या द्रावणात टाकून नष्ट करावेत. ५) रेशीम कीटकाच्या तिसऱ्या अवस्थेपासून पुढे उझी माशी सापळे कोष विणन काळापर्यंत रॅकवर लावावे. ६) रेशीम कीटकांना उझी नाशक गोळी किंवा सापळ्यांचा त्रास होत नाही.

जैविक पद्धतीने नियंत्रण : १) उझी माशीच्या कोषावर उपजीविका करणारे लिसोलायनेक्स थायमस हे परोपजीवी कीटक संगोपन गृहात रेशीम कीटकांनी चौथी कात टाकल्यानंतर तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी सोडावेत. २) १०० अंडीपुंज साठी परोपजीवी कीटकाचे दोन पाऊच लागतात. ३) रेशीम कीटक कोषावर गेल्यानंतर लिसोलायनेक्स थायमस परोपजीवी कीटकांचे पाऊच चंद्रिकेजवळ ठेवावेत.

४. कोश काढणीनंतर परोपजीवी कीटकांचे पाऊच खताच्या खड्ड्याजवळ ठेवावे. ५) परोपजीवी कीटकांची केंद्रीय रेशीम संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, मैसूर येथे आवश्यकतेनुसार मागणी नोंदवावी. ६) मागणी करताना रेशीम कीटक अंडीपुंज संख्या आणि अंडी फुटण्याची तारीख त्यावर नमूद करावी. ७) केंद्रीय रेशीम संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, म्हैसूर येथून अगोदर पैसे भरून मागणी केली तर पोस्ट किंवा कुरियरच्या साह्याने परोपजीवी कीटकांचे पाऊच पाठवले जातात. ८) उशी माशीच्या नियंत्रणासाठी फवारणी केंद्रीय रेशीम संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेने उशी माशीच्या नियंत्रणासाठी उझी साइड, २ टक्के ब्लिचिंग पावडर द्रावण, उझी पावडर आणि उझी नाश याची शिफारस केलेली आहे. ९) केंद्रीय रेशीम संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या सल्ल्यानुसार रासायनिक उझीनाशकाची फवारणी आणि जैविक उपाय एकाच वेळी केले तर ७७ टक्के उझी माशीवर नियंत्रण मिळवता येते. १०) उझी साइड, जैविक उपाय आणि उझी ट्रॅप या तिन्ही उपायांचा एकाच वेळी वापर केला तर ८४ टक्यांपर्यंत उझी माशीवर नियंत्रण मिळविता येते.

संगोपन गृहाची स्वच्छता महत्त्वाची : १) राज्यात ९९ टक्के कच्चे शेडनेट संगोपनगृह आहेत. २) शक्यतो पक्के सिमेंट कॉंक्रीटमध्ये बांधकाम करून शिफारशीप्रमाणे दरवाजे खिडक्या आणि हवा खेळती राहण्यासाठी तिरपी वायुविजन व्यवस्था करावी. ३) खालच्या व वरच्या बाजूस झरोके ठेवावेत. ४) सर्व खिडक्या व दरवाज्यांना नायलॉन वायर मेश जाळीचे संरक्षण करावे, म्हणजे उझी माशी कीटक संगोपनगृहात सरळ प्रवेश करणार नाही. ५) संगोपनगृहात सरळ प्रवेश व्यवस्थेऐवजी बाहेर लहान खोली तयार करून त्यामध्ये प्रवेश करून नंतर दुसऱ्या दरवाज्यामधून आत प्रवेश व्यवस्था असावी. ६) दरवाजे आपोआप बंद होण्याची व्यवस्था असावी. म्हणजे उझी माशीला मज्जाव होईल. ७) तुती पाने साठवण करण्यासाठी वेगळी अंधारी खोली असावी. ८) फांदी खाद्य देण्याअगोदर उझी माशी फांद्या किंवा पानांद्वारे सरळ संगोपन गृहात प्रवेश करते. ९) यासाठी नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात. १०) संगोपन गृहात उंदीर येणार नाहीत याची काळजी घ्यावी. ११) कोष विक्री केलेल्या बाजारातून पोते घरी आणू नये. कारण या सोबत उझी माशीच्या अळ्या, कोष आपल्या संगोपन गृहात येण्याची शक्यता असते. १२) प्रादुर्भावग्रस्त गावात एक दीड महिना (एप्रिल व मे महिना) रेशीम कोषाचे पीक बंद ठेवावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३७ : व्हिक्टोरिया इंग्लंडच्या राणीपदी
१८४० : सॅम्युअल मोर्स यांना टेलिग्राफ चा पेटंट मिळाला.
१८६३ : वेस्ट व्हर्जिनिया अमेरिकेचे ३५ वे राज्य बनले.
१८७७ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरवात केली.
१८८७ : देशातील सर्वाधिक गर्दीचे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (सध्याचे नाव सी. एस. टी.) सुरू झाले.
१८९९ : केंब्रिज विद्यापीठाच्या 'ट्रायपॉस' या गणिताच्या अंतिम परीक्षेत रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे पहिल्या वर्गात पहिले आल्यामुळे त्यांना सिनिअर रँग्लर होण्याचा बहुमान मिळाला.
१९२१ : टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापना
१९६० : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची स्थापना
१९९० : ७.४ मेगावॅटचा भूकंपात इराण मध्ये ५०,००० लोक ठार तर १,५०,००० पर्यंत जखमी झाले.
१९९७ : 'महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी'तर्फे राज्यातील पहिली मुलींची सैनिकी शाळा पुण्याजवळ सुरू झाली.
२००१ : परवेझ मुशर्रफ पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झाले.
२०१४ : प्रसिद्ध कवी केदारनाथ सिंह यांना ज्ञानपीठ पुरस्कार घोषित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : प्रसिद्ध ब्रिटीश व्यापारी व राजकारणी सर एडवर्ड अल्बर्ट ससून यांचा जन्मदिन.
१८६९ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (मृत्यू: २६ सप्टेंबर १९५६)
१८७६ : भारतीय तेलगु भाषिक चित्रपट क्षेत्राच्या इतिहासातील प्रसिद्ध पहिले गीतकार चांदला केसावदासू यांचा जन्मदिन.
१९१५ : टेरेन्स यंग चिनी-इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (मृत्यू: ७ सप्टेंबर १९९४)
१९२० : मनमोहन अधिकारी लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान, कम्युनिस्ट नेते (मृत्यू: २६ एप्रिल १९९९)
१९३९ : रमाकांत देसाई जलदगती गोलंदाज व राष्ट्रीय निवड समितीचे अध्यक्ष (मृत्यू: २८ एप्रिल १९९८)
१९४८ : नौरूचे राष्ट्राध्यक्ष लुडविग स्कॉटी यांचा जन्म.
१९५२ : भारतीय लेखक आणि कवी विक्रम सेठ यांचा जन्म.
१९५४ : ॲलन लॅम्ब इंग्लिश क्रिकेटपटू
१९७२ : पारस म्हांब्रे क्रिकेटपटू
१९७६ : प्रसिद्ध भारतीय महिला कसोटी व एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू देविका पळशीकर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६८ : हेन्रिच रॉथ जर्मनीतील संस्कृत विद्वान आणि धर्मप्रसारक (जन्म: १८ डिसेंबर १६२०)
१८३७ : विल्यम (चौथा) इंग्लंडचा राजा (जन्म: २१ ऑगस्ट १७६५)
१९१७ : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ जेम्समेसन क्राफ्ट्स यांचे निधन.
१९३० : ब्रिटीश कालीन रामपूर रियासतचे नवाब हमीद अली खान बहादूर यांचे निधन.
१९७२ : साली प्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ प्रा. कोट्टरलाकोटा रंगधामा राव यांचे निधन.
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक पद्मभूषण डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)
१९९७ : बासू भट्टाचार्य चित्रफट दिग्दर्शनाच्या पदार्पणातच राष्ट्रपती पुरस्कार मिळवणारे निर्माते व दिग्दर्शक (जन्म: १९३४)
१९९७ : वासुदेव वामन तथा 'भाऊसाहेब' पाटणकर ऊर्फ 'जिंदादिल' मराठीतले पहिले शायर (जन्म: ? ? १९०८)
२००७ : सुप्रसिद्ध भारतीय बंगाली चित्रपट अभिनेत्री अनिता गुहा यांचे निधन.
२००८ : चंद्रकांत गोखले अभिनेते (जन्म: ७ जानेवारी १९२१)
२००९ : पाकिस्तान देशाचे कीटकशास्त्रज्ञ, प्राध्यापक, अभिनेते आणि उद्योजक दतुक रहमान अन्वर सय्यद यांचे निधन.
२०१० : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू गुंडीबाईल रामा सुंदराम यांचे निधन.
२०१३ : भारतीय पत्रकार डिकी रुतनागुर यांचे निधन. (जन्म: २६ फेब्रुवारी १९३१)
१९८७ : जागतिक कीर्तीचे पक्षीतज्ज्ञ, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे एक संस्थापक डॉ. सलीम अली यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८९६)

## मासेमारी जाळी आकाराच्या नियमनाचे महत्त्व

जगभरातील मत्स्यपालनाचा सामान्य इतिहास असे दर्शवितो की शोषणामध्ये हळूहळू वाढ झाली आहे, काही अंशी जमीन जवळ असलेल्या शोषणाच्या साठ्यात वाढ झाली आहे आणि काही अंशी मासेमारीच्या अधिक प्रयत्नांना दूरवरच्या मासेमारीच्या जागेपर्यंत वाढविल्यामुळे जाळी आकाराच्या नियमनाचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे. माशांच्या जाळीच्या नियमनाचा सैद्धांतिक आधार ''इष्टतम कापणी रणनीती'' ( ) च्या संकल्पनेवर आधारित आहे, बर्याच व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाच्या माशांच्या प्रजातींसाठी, भरती मोठ्या प्रमाणात साठा हे आकारात साठा आकाराशी संबंधित नाही. यामुळे परिपूर्णतेची पर्वा न करता, आयुष्यभर प्रत्येक वर्षाच्या शोषणासाठी इष्टतम () शोषणाच्या पद्धतीची कल्पना करणे शक्य करते.

मासे पकडण्याची शक्यता असलेल्या संभाव्य वयाशी संबंधित विचार करता जसे की जेव्हा ते लहान असतात तेव्हा मासे पकडले जातात. जास्त प्रमाणात पकडल्याने लहान आकारातील मासे भविष्यातील माशांच्या उत्पादनाच्या शाश्वत विकासावर परिणाम करतात. याउलट, मासे फार म्हातारे होईपर्यंत पकडले गेले नाहीत तर त्या तुलनेने मोठ्या प्रमाणात मासे मिळतात. सैद्धांतिक दृष्टिकोन म्हणजे मासेमारीत दरवर्षाच्या वजनातील टिकाऊ उत्पन्न जास्तीत जास्त मिळविण्यासाठी कोणते सर्वोत्तम वय किंवा आकार घ्यावा हे ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. हे साध्य करण्याचे अनेक मार्ग आहेत आणि त्यापैकी एक म्हणजे प्रथम कॅप्चरचे वय (किंवा आकार) थेट नियंत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच, जाळीच्या नियमांचा एक उद्देश दीर्घकालीन टिकाऊ उत्पादनावर परिणाम करणे होय. इतर उद्दीष्टे म्हणजे किशोर माशांना पकडण्यापासून वाचविणे आणि पुरेशी मासे परिपक्व राहतील याची खात्री करण्याचा प्रयत्न करणे. हे विशेषत: अशा पातळीवर शोषण करणार्या समभागांसाठी महत्त्वाचे असू शकते कारण कमी झालेल्या साठामुळे भरती अयशस्वी होण्याचा धोका आहे.

# विशाळगडावरील तोडफोड करणाऱ्या समाज कंटकांवर कडक कारवाई करा

## काळ्या फिती बांधून शांततेत रॅली काढून जाहीर निषेध; तलवाडा कडकडीत बंद








तलवाडा

गाजापुर (विशाळगड) येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ काल तलवाड्याचे सकल मुस्लिम बांधवांच्या वतीने बंद चे आव्हान करण्यात आले होते मुस्लिम बांधवांच्या वतीने तलवाडा पोलीस स्टेशन यांच्या मार्फत राज्य शासनाला निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड, जिल्हा पोलीस अधीक्षक बीड ,निवेदन पाठवण्यात आले आहे.

गाजापुर (विशालगड) मध्ये झालेल्या निंदणीय घटना ज्यामध्ये अतिक्रमणच्या नावाखाली विशेष करून मुस्लिम समाजाच्या धार्मिक स्थळांना (मस्जिद, दर्गा) व धार्मिक पुस्तके (पवित्र कुराण) यांची विटंबना करण्यात आली. तसेच विशेष करून मुस्लिम समाजाच्या घरांना टार्गेट करण्यात आले. या झालेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध तलवाडा येथील सर्व मुस्लिम बांधवांच्या वतीने मुक रॅली काढून काळ्या फिती बांधून जाहीर निषेध करण्यात आला आहे. यावेळी मुस्लिम बांधवा सोबत इतर समाजातील समाज बांधवांनी सहभाग नोंदवून सर्व धर्म समभाव भावना आणी सलोखा राखला यावेळी तलवाडा पंचक्रोशीत सर्व व्यापारी बांधवांनी आपले दुकाने बंद ठेवून जाहीर पाठिंबा दिल्या बद्दल सकल मुस्लिम बांधवांनी व्यापारी बांधवांचे आभार मानले आणी समाज कटकावर कडक कारवाई करण्याची मागणी केली कोणत्याही समाजातील व्यक्तीने दोन समाजात तेढ निर्माण होण्यासारखे इस्टग्राम ,फेसबुक, व्हाट्सअप ग्रुप वर किंवा स्टेटस ठेवणे जेणेकरून समाजाचे मन दुखवेल अशी कुणीतेही पोस्ट करू नये या सर्व सोशल मीडियावर पोलिसांची कडी नजर असते कुणीही पोस्ट आक्षेपार्ह केली तर त्याच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल व गुन्हा दाखल करण्यात येईल असे आव्हान सपोनि सोमनाथ नरके यांनी केले आहे.

### सोशल मिडियावर आक्षेपार्ह पोस्ट; दोघांविरूध्द गुन्हा दाखल

मुस्लीम समाजाच्या भावना दुखावतील अशा ताल पध्दतीची पोस्ट तयार करून सोशल मिडियावर व्हायरल केल्याचा प्रकार दिं.१९ रोजी दुपारी उघडकीस आला आहे. या प्रकरणी गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाण्यात शेख तैमुर शेख अफसर यांच्या फिर्यादीवरून ओमकार संतराम उबाळे, आणि नितीन बाबासाहेब उबाळे ,(रा. नंदपुर कांबी ता. गेवराई) यांच्याविरूध्द कलम २९९, ३ (५) भारतीय न्याय संहितेप्रमाणे तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन आरोपींच्या अटकेसाठी पथक रवाना झाल्याचे सपोनि सोमनाथ नरके, यांनी सांगितले

# दिव्यांगासाठी मोफत संगणकीय व व्यावसाईक प्रशिक्षण

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत कायरंत शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह ही संस्था प्रौढ दिव्यांगासाठी मोफत प्रशिक्षण देणारी पश्चिम महाराष्ट्रातील एकमेव शासकीय संस्था आहे. या संस्थेतील प्रशिक्षण वर्गांना महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई ची शासन मान्यता आहे. या संस्थेला अखिल भारतीय स्तरावरील १९९९ हा प्राप्त झालेला आहे. सन २०२४-२५ या चालू शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देणे सुरु आहे. माफक जागा असल्याने त्वरीत संपर्क साधावा असे संस्थेच्या वतीने कळविण्यात आले आहे.

अभ्यासक्रमाचे नांव- अ) सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन वुईथ एम.एस.ऑफिस(संगणक कोर्स)- शैक्षणिक पात्रता-किमान इ. ८ वी पास, ब) मोटार ॲन्ड आर्मेचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज, (इलेक्ट्रीक कोर्स) शैक्षणिक पात्रता-किमान इ. ९ वी पास वयोमर्यादा: १६ ते ४० वर्ष, प्रशिक्षण कालावधी: १ वर्ष, फक्त दिव्यांग मुलांनाच प्रवेश दिला जातो. प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय, अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा, भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण, नेटवर्कींग व इंटरनेटची सुविधा, अनुभवी व तज्ञ निदेशक, उज्वल यशाची परंपरा आणि समाज कल्याण विभागाकडून स्वयराजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल याजना प्रवेश अर्ज व माहितीपत्रक अधिक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, मिरज ता. मिरज जि. सांगली पिनकोड: ४१६ ४१० नंबर ०२३३-२२२२९०८,मोबाईल ९९२२५७७५६१, ९५९५६६७९३६ या पत्यावर पोस्टा व्दारे किंवा समक्ष मोफत मिळतील. प्रवेशासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही. प्रवेश अर्ज पूर्णपणे भरुन फोटोसह संस्थेकडे पाठवावेत किवा समक्ष भरुन द्यावेत प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, मार्कशिट व प्रमाणपत्र अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, कार्ड, प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्ज संस्थेकडे पाठवावेत, प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ज्ञ समिती व्दार मुलाखती घेऊन प्रवश देण्यात येईल. माफक जागा असल्याने गरजू दिव्यांगाना या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी त्वरीत संपर्क साधा. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्ञात असलेल्या गरजू दिव्यांग बांधवाना या शासकीय योजनची माहिती करून द्यावी, असे आवाहन अधिक्षक, शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, मिरज यांनी केले आहे.

# कृषी विभागाकडून लिंबागणेश येथील पिकांची पाहणी

## एकात्मिक किड व रोग व्यावस्थापनाविषयी मार्गदर्शन

लिंबागणेश । प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर लिंबागणेश परीसरात आठवडाभरापासून पाऊस पडत असुन ढगाळ वातावरणामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापुस, तुर,उडीद,मुग आदि पिकांवर बुरशी व किटकांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकरी त्रस्त झाले असुन या पिक रोगांवरील किड व रोग पाहणी आणि संरक्षण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि मार्गदर्शन कृषी विभागाकडून करण्यात यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे व शेतकऱ्यांनी केली होती.



या अनुषंगाने आज दि.१९ शुक्रवार रोजी सकाळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागातील कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ.श्रीकृष्ण झगडे,तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे,मंडळ कृषी अधिकारी प्रशांत घुमरे, कृषी पर्यवेक्षक संतोष काशिद आणि कृषी सहाय्यक रामेश्वर पेसगुडे यांनी शेतीच्या बांधावर जाऊन पिकांवरील किड व रोग पाहणी करत मार्गदर्शन केले.यावेळी अर्जुन गिरे, अमोल गिरे,अझीम सय्यद,बबन गिरे, सर्जेराव मुळे, वैभव गिरे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, डॉ.गणेश ढवळे आदी उपस्थित होते. यावेळी कृषी विज्ञान केंद्र खामगाव येथील पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ.श्रीकृष्ण झगडे यांनी सोयाबीन पिक संदर्भात मार्गदर्शन करताना ज्या ठिकाणी पाणी जमिनीत साचुन राहते त्याठिकाणी झाडांची मुळे जमिनीतुन अन्नद्रव्य घेण्याची प्रक्रिया बंद पडते.अशा जमिनीमध्ये सोयाबीनची पाने पिवळी पडत आहेत अशा ठिकाणी फेरस सल्फेट (विद्राव्य) ५० ग्राम + १९:१९:१९ (विद्राव्य) १०० ग्रम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. उंट अळी,केसाळ अळी, लष्करी अळी या प्रकारच्या अळी वर्गीय किडींच्या व्यवस्थापनासाठी कामगंध सापळ्यांचा सर्वेक्षणासाठी वापर करावा.तसेच ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.अळी वर्गीय कीडींचा प्रादुर्भाव जास्त असल्यास प्रोफानोफोस ५० ईसी ४०० मिली किंवा क्लो-यानट्रानीलीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली किंवा इंडोक्साकार्ब १५.८ टक्के ईसी १४० मिली यापैकी एका किटकनाशकाची प्रती २०० लिटर पाण्यातून फवारणी करावी.खोडमाशी तसेच चक्री भुंगा या किडींच्या व्यावस्थापनासाठी इथिओन ५० टक्के इसी ६०० मिली किंवा क्लो-यानट्रानीप्रोल १८.५ टक्के एससी ६० मिली प्रती २०० लिटर पाण्यातून एक एकर क्षेत्रासाठी या प्रमाणात फवारणी घ्यावी. फवारणी करताना एकच किटकनाशक लागोपाठ फवारणीसाठी वापरू नये.किटकशाशकांची आलटुन पालटुन फवारणी घ्यावी.

# कुसळंब येथील मंदिरात साईनाथ गुरुपूजन सोहळा

पिंपळवंडी । प्रतिनिधी



पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही गुरुपौर्णिमेनिमित्त श्री.साईनाथ मंदिर येथे दि.२१/०७/२०२४ रविवार रोजी गुरुपूजन सोहळा संपन्न होत असून या सोहळ्याचा पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन इंद्रराज गायकवाड महाराज, गहिनीनाथ मिसाळ महाराज, पुजारी हनुमंत धनवटे यांनी केले आहे.

यानिमित्त शनिवार दि.२०/७/२०२४ रोजी सकाळी १० वाजता कलशपूजन होऊन सायंकाळी ६ वाजेपर्यंत साईनाथ गुरु चिंतन व जप अनुष्ठान गुरु मंत्र जप अखंड चालू राहील. सायंकाळी ८ ते पहाटे ४ वाजेपर्यंत सार्वजनिक हरिजागर कार्यक्रम होईल. तसेच गुरुपौर्णिमा रविवार दि.२१ रोजी सकाळी पहाटे ४ ते ६ काकडा,७ ते ८ वाजता श्री साईबाबा अभिषेक ९ ते १० श्री साईबाबांची पालखी खंडेश्वर मंदिरात जाऊन खंडेश्वराचे व श्री. साईबाबांचे पादुका पूजन सोहळा होईल.१० ते १२ वाजेच्या दरम्यान ह. भ.प.इंद्रराज महाराज गायकवाड यांच्या प्रवचनानंतर दुपारी १ वाजता श्री.साईबाबांची आरती होऊन त्यानंतर महाप्रसाद होईल.या सर्व कार्यक्रम सोहळ्याचा व महाप्रसादाचा भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा.

# जाती दावा पडताळणीतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष मोहिम

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र अभावी गैरसोय होवू नये. तसेच कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये याकरिता जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड मार्फत विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रमाणपत्र समितीस्तरावरुन निर्गमित करण्यासाठी दि.२२.०७.२०२४ ते दि.३१.०७.२०२४ या कालावधीत विशेष मोहिम आयोजित करण्यात आली आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होवून जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणामध्ये समितीस्तरावर प्राथमिक छाननी करुन ज्या प्रकरणामध्ये कागदपत्रे/पुरावे अभावी त्रुटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणामध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस () द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रुटी असल्याचे कळविण्यात आलेले आहेत. अशी शैक्षणिक, सेवा, निवडणुक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत. महाराष्ट्र अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातोचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील कलम ८ अन्वये जाती दावा सिध्द करण्याची जबाबदारी ही अर्जदार यांची असल्याने जाती दावा पडताळणीकामी तात्काळ समितीकडे आपल्या प्रकरणातील त्रुटी पुर्तता करण्यात यावी. जेणेकरुन सन २०२४-२५ या पुढील शैक्षणिक वर्षामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यावसायिक पाठ्यक्रमाकरीता राखीव प्रवर्गातून आरक्षीत जागेवर प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थास प्रवेश प्रक्रिया नोंदणी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तरी या कार्यालयात त्रुटी पुर्ततेअभावी आपला जातीदावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी अपात्र ठरल्यास याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार व उमेदवारांची राहील. त्यामुळे समितीच्या वतीने विशेष अभियान दि.२२.०७.२०२४ ते दि.३१.०७.२०२४ या कालावधीत कार्यालयीन वेळेत प्रमाणपत्र पडताळणी त्रुटी पुर्तता विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबीराचा जास्तीत जास्त अर्जदारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

# इरा इंग्लिश स्कूलमध्ये बाल वारकरी दिंडी व वृक्ष दिंडी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील इरा इंग्लिश मध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांची बाल वारकरी दिंडी व वृक्ष दिंडी काढुन एकादशी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

शाळेपासून गावापर्यंत वृक्ष दिंडी व बालवारकरी दिंडी मोठ्या दिमाखात आली.पालखी,तुळशी घेऊन आलेल्या मुली तसेच झेंडे घेतलेली मुले हे पाहता खरोखरच प्रत्यक्षात दिंडी आहे असे वाटत होते.विठ्ठलनामाच्या जयघोषात दिंडीने मार्गक्रमण केले.हनुमान मंदिर समोर इयत्ता चौथी,पाचवी विद्यार्थ्यांनी फेर धरून रिंगण सोहळा,बैलगाडा मनोरा,फुगडी सादर केले तसेच इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्यांनी हरिपाठ सादर केला.विठ्ठलाच्या वेशभूषेत



विराज इंगळे तर रूक्मिणीच्या रूपात अंकिता पांचाळ हिने वेशभूषा केलेली होती.संत तुकाराम,संत नामदेव,संत ज्ञानेश्वर,संत निवृत्तीनाथ,संत सोपानदेव, संत मुक्ताबाई,संत बहिणाबाई,संत कान्होपात्रा इ.प्रतिकात्मक स्वरूपात तयार करण्यात आले होते सर्व ग्रामस्थ हा सोहळा आनंदाने व कौतुकाने पहात होते.जय हरी विठ्ठलाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांप्रमाणेच सर्व छोटी मुले वारकऱ्यांच्या रूपांमध्ये छान दिसत होते तसेच मुली देखील दिंडीमध्ये बाल रूक्मिणी दिसत होत्या.सर्व विद्यार्थ्यांनी ''ज्ञानोबा माऊली तुकाराम ''जयघोषात तल्लीन होऊन विद्यार्थी शाळेत दाखल झाले व पुन्हा फेर धरून रिंगण सोहळा सादर करण्यात आला.अशाप्रकारे बाल वारकरी दिंडी सोहळा उत्साहात पार पडला.

# रामसेठ राठोड लागले माजलगाव विधानसभेच्या तयारीला

## ५०० गाड्यांच्या ताफ्यासह कार्यकर्त्यांचा लवाजमा घेऊन पोहरादेवीस रवाना

बीड । प्रतिनिधी

**सबंध महाराष्ट्र मध्ये आगामी विधानसभेचे वारे वाहू लागले आहे नेते कार्यकर्ते, आमदार, मंत्री हे आपणास उमेदवारी मिळावी यासाठी फिल्डिंग लावत असून यासाठी वाटेल ती किंमत मोजण्यास तयार आहेत. पक्षाने उमेदवारी न दिल्यास पक्ष बदलणे अथवा अपक्ष लढणे असे अनेक निर्धार ही मंडळी करत असल्याचे दिसून येते. मात्र वारंवार आमदारकी भोगत असलेले, व जुने नेतेमंडळी जे की, भावी आमदारकीचे स्वप्न पाहत आज पर्यंत ज्यांना पक्षाने उमेदवारी दिली नाही ते पक्षाशी एकनिष्ठ राहून निवडणुकीच्या तोंडावर पक्षाने उमेदवारी न दिल्याने इतर पक्षात जातात. अशाही लोकांना मतदार संघातील जनता कंटाळली असून यावेळी नवीन चेहरा, युवा नेतृत्व, जनतेप्रती काहीतरी करण्याची धडपड, तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी सदैव प्रयत्नशील, तसेच सर्वसामान्य कुटुंबातून हलकीच्या परिस्थितीशी सामना करत गरिबी काय असते याची जाणीव असणारे रामशेठ राठोड हेच मतदार संघाचा विकास करू शकतील असा ठाम विश्वास मतदारां मधून व्यक्त होत असल्याने मतदारातून रामशेठ राठोड यांना पसंती दर्शविली जात आहे**

माजलगाव तालुक्यातील सर्व परिचित असलेल्या एका छोट्याशा मोगरा या गावातील सर्वसामान्य कुटुंबात जन्मास आलेले रामसेठ राठोड हे मायानगरी समजल्या जाणाऱ्या मुंबई येथे उद्योजक म्हणून नावारूपास आलेले तरुण, युवा व्यक्तिमत्व आहे. गेली अनेक वर्षापासून तळागाळातील लोकांपासून ते सर्व समाजातील लोकांसोबत तसेच युवा, तरुणांसोबत त्यांचे जिव्हाळ्याचे व एकोप्याचे संबंध असून त्यांनी तालुक्यात मजबूत पकड निर्माण केलेली आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांचे अमूल्य योगदान आहे. वंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्ताने गरीब विद्यार्थ्यांना १०००० वह्यांचे वाटप केले असून याच दिनी त्यांनी १००० विविध जातीच्या वृक्षांचे वाटप करून शहरातील विविध क्षेत्रातील लोकांना वृक्षारोपण करण्याचा संदेश दिला. नायक प्रतिष्ठानच्या माध्यमातून तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार असलेल्या १००० तरुणांना उद्योगाच्या माध्यमातून नोकऱ्या देण्याचा मनोदय व्यक्त केला असून यामुळे अनेकांचे कुटुंबास मदत होणार आहे. अशा या सर्वसामान्य कुटुंबातील परिस्थितीशी दोन हात करत उद्योजक असा प्रवास करणाऱ्या बंजारा समाजातून येणाऱ्या रामशेठ राठोड यांनी ओबीसी समाजातून निवडणूक लढवावी असे सर्व समाजातील घटकातून मत व्यक्त होत आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघाला अशाच युवा, तरुण, कुशल व उभरत्या नेतृत्वाची गरज आहे. मतदार संघातील बंजारा, वंजारा, धनगर, मुस्लिम, दलित, गरजवंत मराठा तसेच इतर लहान मोठ्या जाती एकत्र येऊन रामशेठ राठोड यांना ओबीसी समुदायातून विधिमंडळात पाठवण्याचा निर्णय मतदारांनी घेतला असून दि.१८ जुलै गुरुवार रोजी दुपारी रामशेठ राठोड हे ५०० गाड्यांचा ताफा घेऊन बंजारा समाजाचे आराध्य दैवत असलेल्या पोहरादेवी येथे रवाना झाले. पोहरादेवी दर्शन घेऊन आल्यानंतर ते लवकरच मतदारांसमोर आपली भूमिका स्पष्ट करतील.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८९८/२०२३**

**ॲड. घुगे जी. एस.**

**अर्जदार : १) फुलचंद मिठु कदम, वय-५० वर्षे, धंदा-शेती, रा. मोहनगीरवाडी तहत बोरफडी ता. जि. बीड २) कमलबाई मिठु कदम, वय ७० वर्षे, धंदा घरकाम, रा. मोहनगीरवाडी तहत बोरफडी ता. जि. बीड**

**विरुध्द गैरअर्जदार निरंक कोणीही नाही.**

अर्जदार हे भारतीय आहेत. प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे मिठु हरीभाउ कदम यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे मिठु हरीभाउ कदम, रा. मोहनगीरवाडी तहत बोरफडी, ता. जि. बीड हे दिनांक ०९/०९/२०२३ रोजी मौजे रा. मोहनगीरवाडी तहत बोरफडी, ता. जि. बीड मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. मयताचे आई वडील ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊंन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पुढील दिनांक २२/०८/२०२४ आज दिनांक १९/०७/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

आदेशावरुन

स्वाक्षरित

क लिपीक

शिक्का

स्वाक्षरित

**अधिक्षक**

दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# विशालगड येथे दर्गाह मस्जिद आणि नागरिकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ परळीत मोर्चा

**परळी वै । प्रतिनिधी**

कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड आणि गजापूर गावात समाजकंटकांनी केलेल्या भ्याड हल्ल्याच्या व हिंसाचार प्रकरणी निषेध व्यक्त करण्यासाठी परळीत सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उपविभागीय कार्यालयावर भव्य निषेध मोर्चाचे आयोजन आज दिनांक १९ जुलै २०२४ रोजी करण्यात आले होते

या या हल्ल्यात गजापूर येथील मस्तीदीवर आणि मुस्लिम समाजातील अनेक घरांवर केलेल्या हल्ल्याच्या निषेध करण्यात आला आहे मोर्चा नेहरू चौक, आझाद चौक मार्ग उपजिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यामध्ये मुस्लिम बांधवांनी आपल्या हातावर काळी पट्टी बांधून जाहीर निषेध व्यक्त केला. या निवेदनात प्रमुख मागण्या होते की





१)सदर घटना पूर्वनियोजित असून वरील गुन्हे करणाऱ्या आरोपींना लवकरात लवकर अटक करून कठोरात कठोर शिक्षा करावी. २)मोर्चाचे आयोजन करणाऱ्या स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे व इतर पदाधिकारी, पुण्यातील रविंद्र पडवळ, अनेक गुन्हे दाखल असलेला आरोपी हिंदू राष्ट्र सेनेचा प्रमुख धनंजय देसाई यांच्यावर गुन्हे दाखल करावेत व त्यांना ताबडतोब अटक करावी. ३)झालेल्या हिंसाचारात ज्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई द्यावी. ४)जी शेकडो वर्षापासून प्रार्थना स्थळे आहेत त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था शासनाने करावी. ५)मुस्लिम समाजावर कोल्हापुरात व महाराष्ट्रात सतत होणाऱ्या अत्याचाराविरोधात पोलीस अधीक्षक यांच्या द्वारे प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक अत्याचार प्रतिबंधक समिती स्थापन करावी व तिची अंमलबजावणी प्रत्येक जिल्ह्यात करावी. ६) सोशल मीडियात मुस्लिम समाजाबद्दल आणि त्यांच्या अस्थेशी जोडलेल्या धार्मिक स्थळाबद्दल व्हिडीओ बनवणाऱ्या आणि धार्मिक भावना दुखवणाऱ्या मंडळीवर कायदेशीर कारवाई करावी. या या मोर्चात कुठलाही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# कुप्पा येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन कामाची चौकशी करण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील कुप्पा येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये भ्रष्टाचार झाल्याची तक्रार सुंदर चोखोबा सोनवणे व अर्जुन नागोराव सावंत या दोघांनी तब्बल दहा ते बारा वेळा केली मात्र याची दखल घेण्यात आली नाही. यामुळे या दोघांनी अमरण उपोषण करण्याचा इशारा दिल्यानंतर पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी वडवणी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले आहेत .याचा अहवाल तात्काळ देण्याची ही आदेशित केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की कृपा येथे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे काम झालेले आहे. मात्र यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला असून या कामाची बिले देऊ नयेत अशी सुंदर सोनवणे व अर्जुन सावंत यांची मागणी होती. वारंवार मागणी करून याची दखल न घेतल्याने त्यांनी शेवटी २ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला. याची दखल घेत पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी गटविकास अधिकाऱ्यांना पत्र देऊन या कामाची तात्काळ चौकशी करून चौकशी अहवाल पाणीपुरवठा स्वच्छता विभागाला सादर करावा आणि सुंदर सोनवणे व अर्जुन सावंत यांना उपोषणापासून प्रवृत्त करावे याची चौकशी करून या दोघांना उपोषणापासून परावर्तन केले नाही तर होणाऱ्या परिणामास वडवणी गटविकास अधिकारी जबाबदार राहतील असेही सुधाकर मुंडे यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांनो संघर्षाची तयारी ठेवा-माजी आयुक्त बळीराम पवार

## आई-वडील आणि शिक्षक ही संस्काराची खाण-बालकवी संतोष नारायणकर

**परळी । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनौ पावलोपावली संघर्ष आहे संघर्षाची तयारी ठेवा, अपयशाने खचून जाऊ नका सातत्याने संघर्ष करा यश नक्कीच मिळेल असे मार्मिक मार्गदर्शन करत महाराष्ट्र विद्यालय मोहा ही शाळा नसती तर आज बळीराम पवार हे जिल्हाधिकारी न होता ऊसतोड कामगार म्हणून जीवन जगला असता असे शाळेबद्दल गौरव उद्गार माजी आयुक्त बळीराम पवार यांनी केले तर आपले आई-वडील आणि शिक्षक ही संस्कारची खाण असून बालवयात मिळालेले संस्कार हेच पुढील आयुष्यभर आपली ओळख निर्माण करतात असे प्रतिपादन बालकवी संतोष नारायणकर यांनी केले.



परळी तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा चे संस्थापक संचालक कॉ.बापूसाहेब देशमुख यांच्या २२ व्या स्मृती निमित्य स्मृती व्याखानमाला व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळा शुक्रवार दि १९ रोजी महाराष्ट्र विद्यालयात संपन्न झाला.या प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून तर संस्थेचे जेष्ठ संचालक सुदाम देशमुख, सचिव एड.अजय बुरांडे, संचालक सुदाम शिंदे, मुख्याध्यापक मूरलीधर बोराडे,गणपत कोकाटे, संभाजी देशमुख आदी विचार मंचावर उपस्थित होते.

पुढे बोलताना पवार म्हणाले की, आळशी लोकांचा मराठवाडा अशी राज्यभर असलेली ओळख आजच्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या गुणवत्तेच्या आधारे मोडून काढावी.शिक्षण केवळ नौकरी मिळविण्यासाठी न घेता देशाचा एक आदर्श नागरिक बनण्यासाठी घ्यावे.विद्यार्थ्यांनी मनाने आणि शरीराने खंबीर बनत जीवनात सातत्याने संघर्ष करत यश मिळवावे असे सांगितले तर दुसरे प्रमुख अतिथी बालकवी नारायणकर यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून विद्यार्थाचे मनोरंजन करीत प्रबोधन करण्याचे काम केले. विद्यमान परिस्थितीवर प्रकाश टाकणारी ''अशीच एकदा विचारली होती त्यांनी माझी जात.... मी म्हणालो काय सांगू दोन पाय- दोन हात'' ही कविता सादर करत मुलांनी या बालवायत आई-वडील आणि शिक्षक यांच्याकडून मिळालेले संस्कार हेच व्यक्तीला पुढील आयुष्याची ओळख देत असतात असे सांगितले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव एड अजय बुरांडे ह्यांनी करत संस्था ही केवळ विद्यार्थ्यांसाठी काम करत असल्याचे ◀◀ पान ३ वर

# गजापुर (विशालगड) येथील मशिद, दर्गाची व मुस्लिम समाजाच्या घरांची तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई करा

**पाटोदा । प्रतिनिधी**

विशाळगड(कोल्हापुर)पासून सुमारे तीन किलोमीटर लांब अंतरावर असलेल्या छोट्या, छोट्या वस्त्या व गजापूर गावात गरीब मुस्लीम समाजाच्या कुटूंबावर व धार्मिक स्थळावर जातीयवादी संघटनाच्या कार्यकर्त्यांनी जो भ्याड हल्ला केला आहे त्याचा निषेध करत समाजकंटकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी या साठी पाटोदा तालुक्यातील सकल मुस्लिम समाजाच्या वतीने दिनांक १९/०७/२०२४ शुक्रवार रोजी जुम्मा नमाज नंतर दुपारी २:३० वा पाटोदा तहसील कार्यालयावर निषेध मोर्चा काढण्यात आला. या वेळी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रवादी काँग्रेसचे गणेश कवडे, मराठा



## पाटोदा तहसील कार्यालयावर भव्य मुस्लिम समाजाचा निषेध मोर्चा धडकला

सेवक श्री.सुरेंद्र बाबा तिपटे, वंचित बहुजन आघाडीचे गोरख झेंड, सतीश उबाळे, प्रदीप उबाळे यांच्या सह पाटोदा तालुक्यातील सकल मुस्लिम समाज बांधव हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना घोलप, कवडे, तिपटे, झेंड यांनी विशाळगड कोल्हापूर परिसरातील गजापुर येथील घटनेचा तिव्र शब्दात निषेध केला व या घटनेची एटीएस द्वारे सरकारने चौकशी करावी आणि या मध्ये सहभागी असलेल्या समाजकंटक हल्लेखोरावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली. विषयी अधिक माहिती अशी की विशाळगड(कोल्हापुर)च्या पायथ्याशी असणाऱ्या सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील छोट्या-छोट्या वस्त्या व गजापूर गावात गरीब मुस्लीम कुटूंबावर व धार्मिक स्थळावर जातीयवादी संघटनाच्या कार्यकत्यांनी नुकतेच काही दिवसापूर्वी जो भ्याड हल्ला केला आहे त्याचा निषेध करत पाटोदा तालुक्यातील सकल मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने दिनांक १९/०७/२०२४ शुक्रवार रोजी दुपारी २:३० वा पाटोदा तहसील कार्यालयावर निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. सदर निषेध मोर्चा हजरत राज मोहम्मद सहाब चौक (बाजारतळ) येथुन निघून ते तहसील कार्यालयावर जाऊन धडकला. या वेळी ◀◀ पान ३ वर

# मुलाचा गळा दाबून खुन केल्याच्या आरोपातुन आईचा जामीन मंजूर - ॲड. अविनाश गंडले

**बीड । प्रतिनिधी**

प्रकरणाची थोडक्यात हकिकत अशी की, दिनांक २५/०१/२०२४ रोजी शेख नाजीया शेख तैवर रा. दाऊदपुरा बीड ही तीचा मुलगा शेख इजान वय- १४ वर्षे, यांच्या सोबत घरामध्ये असताना तीने त्याचा कान, तोंड, मान, कशाच्या तरी सहाय्याने दाबुन त्याचा खुन केला असा आरोप शेख नाजीया वर करण्यात आला होता. याबाबत पोलीसांनी आकस्मात मृत्यूची नोंद ०४/२०२४ नुसार दाखल केली होती. यामध्ये तपासी अधिकारी यांनी शेजारील लोकांचे अनेकांचे जवाब घेतले त्यामध्ये शेख नाजीया व तीचा मुलगा शेख इजान हे दोघे



घरामध्ये असल्याचे सर्वजण सांगत होते व नाजीया हीचे प्रेमसंबंध इतराशी जोडलेले होते व तसा जवाब दिला होता. त्याअनुषंगाने पोलीसांशी या थेरीनुसार आरोपी ही मयतासोबत शेवटच्या क्षणी असल्यामुळे पेठ बीड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४४/२०२४ कलम ३०२ भा.दं.वि. नुसार दाखल झाला, त्यामध्ये तपास उबाळे कडे देण्यात आला होता. त्यानंतर सदरील गुन्ह्याचे गांभीर्य पाहुन गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक अशोक मुद्दीराज यांचेकडे देण्यात आला. या प्रकरणात पोलीस निरीक्षक अशोक मुद्दीराज यांनी आजु बाजुच्या लोकांचे संशयीताचे जवाब घेतले व आरोपीस दिनांक ०७/०३/२०२४ रोजी अटक केले तेंव्हा पासुन आरोपी ही जिल्हा कारागृह बीड येथे कैद आहे. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी सेशन केस क्र. ८८/२४ नुसार दोषारोपपत्र दाखल केले.

या प्रकरणात ॲड. अविनाश पं. गंडले यांनी आरोपीला कशा पध्दतीने

# बीडमध्ये होणार इज्तेमा; डॉ.योगेश क्षीरसागरांनी केली जागेची पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

शहरात येत्या रविवारी मर्कज मस्जिदमध्ये मुस्लिम बांधवांचा इज्तेमा पार पडणार आहे. याअनुषंगाने नियोजित जागेची राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.१९) पाहणी केली.

शहरातील राजुरी वेस परिसरात विविध कार्यासाठी नियोजित करण्यात आलेल्या जागेत आयोजकांकडून काही मागण्या करण्यात आल्या होत्या. प्रशासनामार्फत आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जागेची पाहणी केली. यावेळी माजी नगरसेवक सय्यद इलियास, उबेद खान, शेख वाजेद, शेख जमील, सलिम अध्यक्ष, इम्रान अत्तर, अहमद चाउस, जुनेद शेख, सादेक शेख आदी उपस्थित होते.

# कार्यकारी अभियंता मार्कंडेय साईडवर आहे असे खोटे सांगत सतत कार्यालयात गैरहजर

## मुख्य अभियंता छ.संभाजीनगर यांच्याकडे अजय सरवदे यांची तक्रार

**बीड । प्रतिनिधी**


कार्यकारी अभियंता सा.बां. क्र २ येथील अधिकारी-कर्मचारी वारंवार गैरहजर राहत आहेत. कार्यकारी अभियंता मार्कंडेय हे कशे दिसतात हेच अनेक नागरिकांना माहीत नाही. पण गुत्तेदाराला माहीत आहे सर्वसामान्य नागरिक आपल्या तक्रारी घेऊन गेले तर कार्यकारी अभियंता मार्कंडेय कार्यालयामध्ये नसल्याने परत जात असतात तसेच ते विना रजा गैरहजर राहत आहेत. मोबाईलद्वारे संपर्क केला असता साईडवर आलो असल्याचे सांगतात. याशिवाय वारंवार गैरहजर राहणे / अनधिकृतपणे गैरहजर राहणे या प्रवृत्तीला आळा बसावा म्हणून शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक अरजा-२०१६/प्र.क्र.८४/सेवा-६, दिनांक १०.१०.२०१७ मधील तरतुदींचे कटाक्षाने पालन कार्यकारी अभियंता मार्कंडेय करत नसल्याचे दिसून येत आहे.

कार्यकारी अभियंता मार्कंडेय यांच्या कार्यकाळात जॉब क्रमांकाच्या कामात प्रचंड प्रमाणात ◀◀ पान ३ वर

### सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ बीडचे कार्यकारी अभियंता मार्कंडेय यांचा महाप्रताप

बीडला अधिकारी आला की जास्त शेफारतो आणि मनमानी कारभार करतो. मनाला वाटले तर ऑफिसला नाहीतर घरी बसून काम करतो अन घोटाळ्याचा काही विषयच नाही कितीही केला तरी कमीच असतो. सार्वजनिक बांधकाम विभाग क्र २ बीडचे कार्यकारी अभियंता मार्कंडेय हे सप्टेंबर एंडिंग पर्यंत रिटायर होणार आहेत. कोणतेही प्रकरण अंगलट येऊ नये म्हणून ते कार्यालयात येत नाही सतत गैरहजर राहतात. हे शासन निर्णयाचे उल्लंघन आहे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मुख्य अभियंता यांच्याकडे तक्रार केली असून कारवाई होईपर्यंत पाठपुरावा करत राहणार.

अजय सरवदे, युवा नेते , वंचित बहुजन आघाडी बीड




# बेलगावच्या रेणुकामाता देवस्थानास शासनाचा 'ब' दर्जा प्रदान

## माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार..

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील बेलगाव ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेले तसेच आटेगाव पुठ्ठ्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या रेणुका माता देवस्थानास राज्यशासनाकडून ''ब'' दर्जा प्रदान करण्यात आला आहे. ''ब''दर्जा मिळावा यासाठी माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी वेळोवेळी गेलेल्या पाठपुराव्याचे हे शक्य झाल्याने बेलगाव ग्रामस्थांच्यावतीने त्यांचे जाहीर आभार मानले आहेत. बेलगाव ग्रामस्थांचे आराध्य दैवत म्हणून तसेच नवसाला पावणाऱ्या जगदंबा मातेचे मंदिर निसर्गरम्य वातावरणात हे मंदिर असून या मंदिराच्या विकासात भर पडावी असा मानस ''ब'' दर्जाची आवश्यकता असल्याने उद्योजक प्रविण वारे व ग्रामस्थांच्या मागणीने तसेच माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या वेळोवेळीच्या पाठपुराव्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्रांस ''ब'' वर्ग दर्जा महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाने शासननिर्णय काढून प्रदान केला आहे. या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच मंत्रालयातील सचिव, मंत्री यांना वेळोवेळी केलेल्या पत्र व्यवहार आणि केलेल्या सूचनेमुळेच अनेक वर्षांपासूनची मागणी अखेर माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांने प्राप्त झाली असून युवा उधोजक प्रविण वारे यांच्या वेळोवेळीच्या मागणीने हे यश मिळाल्याने सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थ,रेणुकाई भक्तांनी आभार मानले तर बेलगाव ग्रामस्थांसाठी ही अतिशय आनंदाची बाब असून माजी राज्यमंत्री सुरेश धस यांचा ग्रामस्थांच्यावतीने जाहीर सत्कार करण्यात येणार असल्याचे बेलगांव ग्रामस्थांनी यावेळी सांगितले आहे.



# मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत आष्टी मतदार संघासाठी ५१ कोटीचा निधी मंजुर - आ. आजबे

**आष्टी । प्रतिनिधी**



मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा -२ ( बॅच - १) संशोधन व विकास अंतर्गत आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील रस्त्यांची दर्जेन्नती करण्यासाठी ५१ कोटी रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला असून लवकरच या कामाचे टेंडर निघून प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती आ. बाळासाहेब आजबे यांनी दिली.

आष्टी - पाटोदा - शिरूर विधान सभा मतदार संघातील रस्त्यांची दर्जेन्नती करण्याची मागणी आ. बाळासाहेब आजबे यांनी केली होती. या मागणीला यश आले असुन तीन तालुक्यातील रस्ते विकासासाठी ५१ कोटी रुपये मंजूर झाले आहेत हा निधी मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री अजितदादा पवार उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस ग्राम विकास मंत्री गिरीशजी महाजन व कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा निधी मंजूर झाला असल्या मुळे आपण मतदारसंघाच्या वतीने त्यांचे आभार मानत असल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील पुढील प्रमाणे रस्ते विकास कामामध्ये आहेत १)प्र. रा. मा. १६ - पिंपळवंडी जवळ अश्वलिंग खोपटी रस्ता कि. मी. ०/०० ते ५/०० ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.२० जुलै २०२४ । पान ७

# दाखल्यांपासून ते रेशनकार्डपर्यंत बनावटगिरीचा कळस
# पूजा खेडकरच्या चिंधीगिरीचा आणखी एक कारनामा समोर

**पुणे । प्रतिनिधी**

वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकरांचे रोज एक नवे प्रताप समोर येत आहे. खेडकर कुटुंबीयांनी बनवलेलं बनावट रेशनकार्ड एबीपी माझाच्या हाती लागलं आहे. याच रेशनकार्डच्या आधारे पूजाने पिंपरी पालिकेच्या वायसीएम रुग्णालयाकडे अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज केले होते आणि त्याच आधारे तिला डाव्या गुडघ्यात सात टक्के कायमस्वरूपी आधू असल्याचं प्रमाणपत्र देण्यात आलं. पुढं याच प्रमाणपत्राच्या आधारे पूजाने केंद्रीय दिव्यांग विभागाकडून अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवले होते. अशातच हे प्रमाणपत्र योग्य की अयोग्य असा



प्रश्न उपस्थित झाला असताना खेडकर कुटुंबीयांनी बनवलेलं बनावट रेशन कार्ड एबीपी माझाच्या हाती लागेलेलं आहे. थर्मोव्हेरिटा कंपनीचा पत्ता देत खेडकर कुटुंबीय रहिवाशी असल्याचं या रेशनकार्ड द्वारे दाखवण्यात आलं होतं.

साधारण ९ जुलैपासून पूजा खेडकरांचं प्रकरण समोर आल्यापासून ते आजपर्यंत रोज नवेनवे खुलासे आणि चक्रावून टाकणारी बनावट कागदपत्रांची प्रकरणं आता समोर येत आहेत.

पूजाचे आतापर्यंतचे कारनामे

९ जुलै - पूजा खेडकरांनी आयएएस होण्यासाठी सादर केलेले दिव्यांग प्रमाणपत्र संशयास्पद असल्याचं समोर १० जुलै - दिव्यांगांच्या कोट्यातून परीक्षा देण्यासाठी दृष्टीदोष आणि मेंटल इलनेस सर्टिफिकेट मिळवल्याचं समोर ११ जुलै - ओबीसी कोट्यातून परीक्षा देण्यासाठी नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट मिळवल्याचं समोर १२ जुलै - पूजाची आई मनोरमा खेडकरांनी पिस्तुलाचा धाक दाखवून शेतकऱ्यांना धमकावल्याचं समोर १३ जुलै - पूजा खेडकरांनी लाल दिवा वापरताना नियमांचा भंग केल्याचं स्पष्ट, पोलिसांकडून कारवाई सुरू १४ जुलै - ऑडी कार पोलिसांकडून जप्त, पूजा खेडकरांचे आईवडील गायब असल्याचं स्पष्ट १५ जुलै - एमबीबीएस करताना पूजा खेडकरांचं काशीबाई नवले महाविद्यालयात वेगळं नाव असल्याचं समोर १५ जुलै - वडील क्लास वन अधिकारी असतानाही नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट देऊन एमबीबीएसला प्रवेश घेतल्याचं समोर १६ जुलै - पूजा खेडकरांच्या प्रशिक्षणाला ऊझढ कडून स्थगिती १९ जुलै - पूजा खेडकरांवर यूपीएससी एफआयआर दाखल करणार १९ जुलै - थर्मोव्हेरिटा कंपनी पिंपरी-चिंचवड पालिकेकडून सील १९ जुलै - पूजा खेडकर यांच्या कुटुंबियांचं बनावट रेशनकार्ड एबीपी माझाच्या हाती मात्र त्याचवेळी पूजा खेडकरला या पदापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनातल्या ज्या भ्रष्ट लोकांनी मदतीचा हात दिला त्यांच्यावर कधी ही कारवाई केली जाणार असाही प्रश्न पडत आहे.

# कारवाई टाळण्यासाठी गॅस वितरकांचा अनोखा फंडा

शिरूर : शिरूर तालुक्यातील एस. डी. दुगड हे एच.पी. गॅस वितरक जादा दराने गॅस विक्री करत असल्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष संपत फराटे यांनी लेखी तक्रार केली होती. मात्र यावर अद्याप प्रशासनाकडून कुठलीही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. तक्रारींच्या अनुषंगाने दुगड हे गॅस वितरक आपल्यावरील कारवाई टाळण्यासाठी अनोखी फंडे वापरत असल्याचे समोर आले आहे.

संबंधित गॅस वितरकाने एका विहित नमुन्यामध्ये वैयक्तिक अर्ज तयार करून सीएससी चालकांची गॅस वितरणाबाबत कुठलीही तक्रार नसल्याचे पत्र सीएससी चालकांकडून त्यांच्या स्वाक्षरीने लिहून घेण्यास सुरुवात केली आहे. यातील अनेक सीएससी चालकांना हे पत्र चुकीचे वाटत असल्याने त्यांनी यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिल्याने सदर बाब समोर आली आहे. आपली गुंतलेली मान मोकळी करण्यासाठी तालुक्यातील सिएससी केंद्राकडून माझी गॅस वितरणबाबत कोणतीच तक्रार नाही,आमच्याकडून गॅस सेवा सुरळीत देतो आहे,तसेच तुम्हाला वेळेत कमिशनही देतो आहे, असे वैयक्तिक पत्र काढून त्यावर सही करा. असा लखोटा गॅसच्या गाडीबरोबर पाठवून तक्रारीतून निसटण्याचा प्रयत्न शिरूरचे एचपी डीलर्स एस.डी.दुगड यांच्याकडून केला जात असल्याची बाब समोर येत आहे.

शिरूर तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या तीन महिन्यापासून सिएससी केंद्राकडे गॅस सेवा सुरळीत होत नाही. केवायसीच्या नावाखाली गॅस पुरवठा



कमी होत आहे. हे कारण पुढे करून ठराविक व स्वतःकडील केंद्रांद्वारे गॅस पुरवठा करून सिएससी केंद्राला दुय्यम वागणूक देऊन पुरवठा करण्यास टाळाटाळ होत आहे. शिवाय आत्तापर्यंत कसलेही कमिशन देण्यात आलेले नसतानाही शिरूर येथील कार्यालयाकडून आम्ही आपणास सेवा सुरळीत देत आहोत आणि कमिशनही देत आहोत, अशा आशयाचे पत्र व त्यावर सह्या घेतल्या जात असल्याची निदर्शनास आली आहे.

## रोटरी क्लब उद्योगनगरीच्या अध्यक्षपदी प्रशांत शेजवळ तर सचिवपदी वैभव गवळी



**पिंपरी । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ उद्योगनगरी, पिंपरीच्या अध्यक्षपदी रो. प्रशांत शेजवळ तर सचिवपदी रो. वैभव गवळी

यांची निवड करण्यात आली.

क्लबच्या सर्व संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा पुनावळे येथे संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ चे प्रांतपाल शीतल शहा ,नियोजित प्रांतपाल नितीन ढमाले,सहाय्यक प्रांतपाल जगमोहन भुर्जी उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष प्रशांत शेजवळ यांनी पुढील वर्षभरात हाती घेण्यात येणाऱ्या विविध समाजिक उपक्रमांची माहिती दिली.

सर्व संचालकांनी देखील सामाजिक कार्य करण्याची शपथ घेतली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची

कार्यकारिणी पुढीलप्रमाणे -

प्रशांत शेजवळ (अध्यक्ष) , वैभव गवळी (सचिव), श्रीनिवास कोरे (खजिनदार), योगेश टिपरे, डॉ. निलेश लोंढे, विवेक येवले, शिवाजी पाटील, डॉ. विष्णू नांदेडकर, भूषण पाटील, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. समीक्षा जर्डे , जयंत अर्वट , अभिजित कढाणे, अक्षय घारपुरे, प्रमोद जाधव, गुरूदास भोंडवे, अनिल खेडकर, रवींद्र घारे ( सर्व संचालक )

## कासारी येथे ६० जणांची आरोग्य तपासणी

**तळेगाव ढमढेरे । प्रतिनिधी**

कासारी (ता. शिरूर) येथे झालेल्या मोफत आरोग्य शिबिरात ६० जणांची आरोग्य तपासणी करून उपचार करण्यात आले. तसेच यावेळी ९० युवकांनी रक्तदान केले. शिरूर तालुका पोलिस मित्र समितीचे अध्यक्ष गणेश सातपुते व प्रसिद्धी प्रमुख संपत शेळके यांच्यातर्फे शिबिराचे आयोजन केले होते. पुरंदर ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तदान घेण्यात आले. डॉ. अमीर कोतनाळ व डॉ. प्रीतम वैराग यांनी आरोग्य शिबिरात मार्गदर्शन केले. यावेळी प्रीती ढोणे, संतोष नवले, पंकज धुमाळ, साधना काळकुटे, महेश शितोळे, अक्षय चव्हाण, रोहित भुजबळ, लालचंद थोरात, सचिन कुदळे, संभाजी उमाप, अभिषेक चव्हाण, अक्षय नवले, अनिल गिरी, आकाश मुळे, महेंद्र गवते, संगीता रुके, सुशांत रुके, सुरेश कोळपे आदी उपस्थित होते.

# मुंबई-बंगळुरू बाह्यवळण महामार्गावर अवजड कंटेनरचा अपघात

### केबिनमध्ये अडकलेल्या चालकाची सुटका

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण महामार्गावर दोन कंटेनरमध्ये झालेल्या अपघातात एका कंटेनरचा चालक गंभीर जखमी झाला. अपघातग्रस्त कंटेनरच्या केबिनमध्ये अडकलेल्या चालकाची अग्निशामक दलाच्या जवानांनी सुटका केली. गंभीर जखमी झाल्याने चालकास तातडीने उपचारांसाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना शुक्रवारी सकाळी साडे आठ वाजण्याच्या सुमारास जांभूळवाडी दरीपुल परिसरात घडली.

रावसाहेब पिंगारे असे जखमी झालेल्या कंटेनरचालकाचे नाव असून त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. बाह्यवळण महामार्गावरील जांभूळवाडी येथील दरीपुलाजवळ मंगळवारी सकाळी साडे आठ वाजता पुढे चाललेल्या कंटेनरवर पाठीमागून आलेला अवजड कंटेनर आदळला. पाठीमागील अपघातग्रस्त कंटेनरच्या केबिनमध्ये चालक अडकला होता.

त्याबाबतची माहिती अग्निशामक दलास मिळाली. त्यानंतर काही वेळातच अग्निशामक दलाचे जवान रेस्क्यू व्हॅनसह घटनास्थळी दाखल झाले. केंद्रप्रमुख प्रकाश गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जवानांनी कटरच्या साहाय्याने केबिन कापून अडकलेल्या चालकास बाहेर काढले.त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.




अपघातामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात डिझेल सांडल्याने रस्ता ही निसरडा झाल्याने अपघातानंतर वाहतूक विस्कळित झाली होती. अग्निशामक दलाच्या जवानांनी निसरड्या रस्त्यावर माती टाकली. त्यानंतर वाहतूक पूर्ववत केली.

# शेतकऱ्याचा मुलगा बनला सीए

### अमोल ढेरंगे आयसीएआयच्या परीक्षेत यश

**पिंपरी । प्रतिनिधी**

गुळाणी (ता. राजगुरू नगर)सारख्या एका खेड्यातील,सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील ह. भ. प. सखाराम लक्ष्मण ढेरंगे व कल्पना सखाराम ढेरंगे यांची सीए सचिन आणि सीए अमोल ढेरंगे हे दोन्ही मुले सीए बनले . सध्या सीए सचिन हे पिंपरी चिंचवड सीए शाखेच्या विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. दोन्ही मुले सीए असणारे कल्पना आणि सखाराम ढेरंगे हे खेड तालुक्यातील एकमेव पालक आहे. सीए अमोलचे

प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुळाणी गावात झाले. माध्यमिक शिक्षण श्रीमंत महाराजा यशवंतराव



होळकर विद्यालय, वाफगाव, महाविद्यालीन शिक्षण हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर येथे घेतले. अमोल ढेरंगे आयसीएआयची अंतिम परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याने गुळाणी गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवाला आहे.सीएचा अभ्यास पुणे शहरात केला.

# पूजा खेडकरची नियुक्ती रद्द होणार? यापुर्वी कोणाची निवड झाली रद्द, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी दिली मोठी माहिती

पुणे । प्रतिनिधी

वादग्रस्त प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरवर (ख-ड झ्रक्षर घहशवङ्गरी) एफआयआर दाखल करण्याचा निर्णय यूपीएससीने घेतला आहे, पूजा खेडकर यांचं आयएएस केडर रद्द करणे आणि सर्व परीक्षांसाठी बाद करण्यासाठी त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. ही माहिती केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) प्रसिद्धीपत्रक जारी करून दिली आहे.त्यामुळे आता पूजा खेडकरच्या अडचणी आणखी वाढण्याची शक्यता आहे.

पूजा खेडकरची निवड रद्द का करू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. आता



या नोटीसवरती पूजा खेडकर काय उत्तर देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. या सर्व प्रकरणावर माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी बोलताना सांगितलं की, पूजा खेडकर प्रकरण नुसतंच माझ्या वाचनात आलं. यूपीएससी सारख्या व्यवस्थेकडून जी अपेक्षा आहे. ती कठोर पावले ते उचलताना दिसत आहेत. यूपीएससीच्या त्या निवेदनात स्पष्टपण म्हटलं आहे. नियमानुसार असलेल्या संधीपेक्षा जास्त वेळा ते देखील फसवणूक करून संधी घेतली आहे. माझी यूपीएससीकडून अपेक्षा आहे, त्यांनी कठोरपणे कारवाई करावी. यूपीएससीवर असलेला विश्वास ते टिकवून ठेवत योग्य ती कारवाई केली जाईल असंही त्यांनी म्हटलं आहे. तर याआधी देखील अशी दोन ते तीन प्रकरणे समोर आलेली आहे. त्यांची नियुक्ती देखील रद्द करण्यात आल्याचं माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी म्हटलं आहे.

पद रद्द करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकरवर एफआयआर दाखल करण्याचा निर्णय यूपीएससीने घेतला आहे, पूजा खेडकरचं आयएएस केडर रद्द करणे आणि सर्व परीक्षांसाठी बाद करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. पूजा खेडकरने यूपीएससी परीक्षा देण्यासाठी जी प्रमाणपत्र सादर केलेली आहेत, ती बोगस असल्याचे एव्हाना सिद्ध झाली आहे, त्यानंतर यूपीएससीने हा मोठा निर्णय घेतला आहे. पूजा खेडकर २०१८ पर्यंत सामान्य विद्यार्थिनी म्हणून परीक्षा देत होती. मात्र २०१८ नंतर तिने नाव बदलले, खोटी ओळख निर्माण केली, दिव्यांग असल्याची खोटी कागदपत्रे सादर केली. ही खोटी कागदपत्रे मिळवताना तिने माहिती लपवली. जेव्हा वैदकीय चाचणी घेण्याचा निर्णय घेतला तेव्हा त्या वैद्यकीय चाचणीला उपस्थित राहिल्या नाहीत. त्यानंतर अनेक गंभीर प्रकार लक्षात आले आणि त्यानंतर युपीएससीने हे पाऊल उचललं आहे.पूजा खेडकरचे फक्त आयएएस पद्द रद्द करणे नाही तर आयएएस पद मिळवण्यासाठी जी कृत्ये केली आहेत ती अतिशय गंभीर आहे किंवा गुन्ह्याच्या स्वरूपाची आहे हे लक्षात घेऊन तिच्यावर गुन्हा दाखल करायचं ठरवले आहे.

## वानवडीत अनधिकृत बांधकामावर बुलडोझर चालवत कडक कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

वानवडीत हॉटेल तसेच दुकानावर पालिकेच्या मुख्य खात्याच्या बांधकाम विकास विभागामार्फत अनधिकृत बांधकामावर बुलडोझर चालवत खडक कारवाई करण्यात आली यावेळी जेसीबीच्या साह्याने पत्र्याचे शेड बांधकाम असे कोण ७५०० चौरस फूट बांधकाम पाडण्यात आली जगताप चौक येथून राज्य राखीव पोलीस दलाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या खाजगी जागेत अनधिकृत पणे अतिक्रमण करून सुरू केलेल्या द डॉग हॉटेल पुणेरी कट्टा अलवान कॅटर्स स्टार चिकन आणि लोबस ऑटोमोबाईल या दुकानावर कारवाई करण्यात आली कारवाई करण्यात आलेली जागा खाजगी असून ती न्यायप्रविष्टआहे आलेल्या तक्रार अर्जानुसार संबंधित हॉटेल व दुकानदारांना वीस दिवसाची नोटीस देण्यात आली होती परंतु स्टे ऑर्डर येईपर्यंत ७५०० फुट बांधकाम वर कारवाई सुरू असतानाच दीड तासानंतर न्यायालयाची ऑर्डर आल्याने कारवाई थांबवण्यात आली तोपर्यंत जवळपास ७५०० चौरस फूट अनधिकृत बांधकाम पाडण्यात आली होते श्री उठल्यानंतर पुन्हा कारवाई करण्यात येणार असल्याचे उपलब्ध अभियंता विजय दाभाडे यांनी यावेळी सांगितले परंतु ही कारवाई करत असताना जलद गतीने ड सिद्धार्थ संजय अग्रवाल ड परमेश्वर शिवाजी काकडे ड ऐश्वर्या पाटील सहाय्यक संतोष रोकडे अमर यादव यांनी या सर्व कारवाईवर अधिकृत स्टे ऑर्डर मिळवत ही कारवाई थांबवली या कारवाईवर स्थानिक राजकीय लोकांचा दबाव असताना देखील ही कारवाई सिद्धार्थ अगरवाल यांच्या टीमने अत्यंत जलद गतीने थांबवली.

# पुणे जिल्ह्यातील धरणांमध्ये पाणीसाठ्यात मोठी वाढ; सर्व धरणांत ४७.८६ टीएमसी पाणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील धरणांमध्ये पाणीसाठ्यात आता मोठी वाढ झाली आहे. या सर्व धरणांमध्ये मिळून आजअखेरपर्यंत एकूण ४७.८६ टीएमसी पाणी जमा झाले आहे. यामुळे जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा आता २४.१३ टक्के झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा आजअखेपर्यंतचा एकूण पाणीसाठा हा ३.७७ टीएमसीने अधिक झाला आहे.

शहर व जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात सुरवातीला जूनच्या पहिल्याच आठवड्यात पाऊस पडला. त्यानंतर मात्र पावसात खंड पडल्याने, धरणांमधील पाणीसाठ्यात फारशी वाढ होऊ शकली नव्हती. मात्र जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून ’टप्प्याटप्प्याने पाऊस पडण्यास सुरवात झाली आहे.याशिवाय धरणांच्या पाणलोट क्षेत्रातील पावसातही वाढ झाली आहे. परिणामी जिल्ह्यातील धरणांमध्ये पाण्याचा ‘येवा’ आता दिवसेंदिवस वाढू लागला आहे. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या आजच्या तारखेच्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे.

गेल्या वर्षीच्या आजच्या तारखेला जिल्ह्यातील धरणांमधील एकूण उपलब्ध पाणीसाठा हा ४४.०९ टीएमसी इतका होता. सध्याचा पाणीसाठा हा ४७.८६ टीएमसी इतका झाला आहे. यावरून गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा हा पाणीसाठा ३.७७ टीएमसीने वाढला आहे. जिल्ह्यातील या २६ धरणांव्यतिरिक्त टाटा समूहाच्या सहा धरणांमधील पाणीसाठा वेगळा आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ३२ धरणे आहेत. यापैकी सहा धरणे ही टाटा समूहाची आहेत. टाटा समूहाची धरणे वगळता उर्वरित २६ धरणे आहेत. जिल्ह्यातील धरणांमध्ये उजनी, भामा आसखेड, माणिकडोह, चासकमान, पवना, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, गुंजवणी, नीरा देवधर, भाटघर, वीर आदी प्रमुख धरणांचा समावेश आहे.

ऋटाटा’च्या धरणांत १६.८१ टीएमसी साठा

पुणे जिल्ह्यात टाटा उद्योग समूहाची सहा धरणे आहेत. या सहा धरणांमध्ये मुळशी, ठोकरवाडी, शिरोटा, वळवण, लोणावळा आणि कुंडली यांचा समावेश आहे. या सहा धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता ही ४२.७६ टीएमसी इतकी आहे. या धरणांमध्ये सध्या १६.६१ टीएमसी (३८.८४ टक्के) उपयुक्त पाणीसाठा जमा झाला आहे. या सहापैकी लोणावळा या धरणांत केवळ ०.२० टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे.

दरम्यान, उजनी जलाशयातील पाणीसाठा अद्यापही ‘मायनस’मध्येच कायम आहे. अचल पाणीसाठा पूर्ण जमा होण्यासाठी आणखी १३.३४



टीएमसी पाणी कमी आहे. त्यामुळे या धरणात जोपर्यंत आणखी १३.३४ टीएमसी पाणी जमा होत नाही, तोपर्यंत चल साठा जमा होण्यास सुरुवात होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.